

आम्ही गडकरी-फडणवीसांना निवडून दिलं... (पान ५ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



विजय हजारे ट्रॉफी- एमपी आणि मुंबईचा सलग तिसरा विजय (पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatan@gmail.com | मंगळवार दिनांक ३० डिसेंबर २०२५ | अंक : १४६ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...


### बहिरम यात्रेतील दवाखाना शनिवारी बंद




चांदूर बाजार तालुक्यातील प्रसिद्ध बहिरम यात्रेतील दवाखाना शनिवारी (२७) बंद होता. यामुळे यात्रेकरूंना वैद्यकीय उपचारांविना गैरसोयीचा सामना करावा लागला. गेल्या दोन आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या या यात्रेत अवघ्या काही दिवसांतच गैरव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक बहिरम यात्रेसाठी येतात. मात्र यावर्षी पार्किंगसाठी जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. आरोग्य सेवाही अनियमित असल्याने मूलभूत सुविधांबाबत भाविकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ठरवून दिलेल्या दरांपेक्षा जास्त पैसे आकारले जात असतानाही पंचायत समिती अधिकाऱ्यांचे यावर नियंत्रण नसल्याचे भाविकांचे म्हणणे आहे.

यात्रा अधीक्षक रामेश्वर रामागडे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी समाधानकारक माहिती दिली. मात्र, त्यांनी दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात मोठी तफावत असल्याचे दिसून आले. यामुळे यावर्षीच्या यात्रा व्यवस्थापनाकडे पंचायत समिती अधिकाऱ्यांचे पुरेसे लक्ष नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

### 9 जाने.पासून भीमाशंकर मंदिर 3 महिने बंद राहणार



पुणे- पुण्यात १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर ९ जानेवारीपासून ३ महिन्यांसाठी बंद राहणार आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिरातील विकासकामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी एका बैठकीत सर्वसंमतीने हा निर्णय घेतला. भाविकांच्या सोयीसाठी महाशिवरात्रीदरम्यान, १२ ते १८ फेब्रुवारी आठवडाभराच्या कालावधीत मंदिर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

जिल्हा प्रशासनाने देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व ग्रामस्थांसोबत नुकतेच संयुक्त बैठक घेतली होती. या बैठकीत सविस्तर चर्चेनंतर सर्वसंमतीने भीमाशंकर मंदिर ३ महिन्यासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याला येणारे लाखो भाविक भीमाशंकरलाही दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. त्यांच्या सोयीसाठी मंदिरातील विकासकामे नियोजित वेळेत पुर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले.

### भीमथडी जत्रे'त चोरट्यांकडून हातसाफ

'भीमथडी' जत्रेतील एका स्टॉलमधून ५५ हजारांची रोकड चोरट्यांनी लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.याबाबत एका महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला मूळच्या इंदापूरमधील बेलवडी-थोरातवाडी गावातील रहिवासी आहे. महिला आणि गावातील बचत गटातील महिलांनी कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित केलेल्या 'भीमथडी' जत्रेत खाद्यपदार्थांचा स्टॉल लावला आहे. गुरुवारी (२५ डिसेंबर) नाताळची सुट्टी असल्याने 'भीमथडी' जत्रेत गर्दी झाली होती. खाद्यपदार्थ विक्रीतून जमा झालेली रोकड महिलेने स्टॉलमधील स्टिलच्या डब्यात ठेवली होती.

# भाजपचा 'घराणेशाही'ला ब्रेक!

## महापालिकेत आमदार-खासदारांच्या मुलांना तिकीट नाही; नाशिक, कोल्हापुरात बड्या नेत्यांच्या वारसांची माघार

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- नगरपालिका निवडणुकीत एकाच कुटुंबातील सहा जणांना संधी देणाऱ्या भाजपने महापालिका निवडणुकांसाठी मात्र आपली रणनीती पूर्णपणे बदलली आहे. "पक्षासाठी राबणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळावा," या उद्देशाने विद्यमान आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्या पत्नी किंवा मुलांना उमेदवारी न देण्याचा धोरणात्मक निर्णय पक्षाने घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत प्रकर्षाने दिसून आली.

मुंबई महापालिकेसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होणार आहेत. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटचा दिवस आहे. भाजपच्या उपरोक्त निर्णयामुळे आज अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी भाजपच्या आमदार आणि खासदार पुत्रांनी आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

नाशिकमध्ये भाजपच्या दोन आक्रमक महिला आमदारांच्या मुलांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. आमदार देवयानी फरांदे यांच्या मुलाने भरलेला उमेदवारी अर्ज पक्ष धोरणानुसार मागे घेण्यात आला. "पक्षाच्या या निर्णयामुळे सामान्य कार्यकर्त्यांना बळ मिळेल," अशी प्रतिक्रिया फरांदे यांनी दिली. तर आमदार सीमा हिरे यांच्या मुलीनेही नाशिक महापालिका निवडणुकीतून आपले नाव मागे घेतले आहे.

### कोल्हापुरात महाडिक पुत्राची माघार

खासदार धनंजय महाडिक यांचे चिरंजीव कृष्णराज महाडिक यांनीही कोल्हापुरातून माघार घेतली आहे. कृष्णराज यांनी सुरुवातीला वरिष्ठांच्या परवानगीने अर्ज भरला होता, मात्र राज्य पातळीवर 'घरातील व्यक्तींना उमेदवारी नाही' हा नियम ठरल्यानंतर त्यांनी तत्काळ माघार घेण्याचा निर्णय घेतला. "आम्ही पक्षाचे आदेश मानणारे शिस्तबद्ध कार्यकर्ते आहोत," असे धनंजय महाडिक यांनी यावेळी स्पष्ट केले.

### नार्वेकर कुटुंबीय ठरले अपवाद

दरम्यान, भाजपच्या या कडक नियमावलीमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे कुटुंब मात्र अपवाद ठरले आहे. नार्वेकर यांच्या भावाला आणि वहिनीला पक्षाने उमेदवारी जाहीर केली असून, यामुळे राजकीय वर्तुळात काही प्रमाणात उलट-सुलट चर्चाही सुरू आहेत.

### नाराजांची समजूत काढण्याचे आव्हान

तिकीट न मिळाल्यामुळे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचे पक्षासमोर मोठे आव्हान असणार आहे. याबाबत खासदार महाडिक म्हणाले की, "महायुतीची सांगड घालताना काही ठिकाणी अन्याय झाला असू शकतो, मात्र आम्ही दोन दिवसांत सर्व नाराजांची समजूत काढू. अनेक काँग्रेसचे इच्छुक आमच्या संपर्कात आहेत, मात्र आमची यादी आता निश्चित झाली आहे."



## छत्रपती संभाजीनगरात 'हाय-व्होल्टेज' ड्रामा:राजेंद्र जंजाळांचे अश्रू पाहून कार्यकर्ते शिरसाटांच्या घराबाहेर जमा, युती तोडण्याची मागणी

दिव्य वतन /वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास अवघे 24 तास शिल्लक असताना, महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच चिघळला आहे. भाजपच्या पाचव्या प्रस्तावात शिवसेनेच्या ताब्यातील 7 महत्त्वाच्या जागा भाजपकडे गेल्याची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांचा संयम सुटला. "जर कार्यकर्त्यांवर अन्याय होणार



असेल, तर मी निवडणूक लढणार नाही," अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त करत जंजाळ यांना अश्रू अनावर झाले. या नाट्यमय घडामोडींनंतर शेकडो कार्यकर्त्यांनी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या निवासस्थानाकडे कूच केली असून, शहरात राजकीय तणाव निर्माण झाला आहे.शिवसेना आणि भाजपमध्ये जागावाटपासाठी आतापर्यंत नऊ बैठका होऊनही तोडगा निघालेला नाही. भाजपच्या ताज्या प्रस्तावानुसार, जंजाळ समर्थकांचे वर्चस्व असलेले आणि शिवसेनेचे बालेकिल्ले मानले जाणारे 7 प्रभाग भाजपला देण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

हे तेच प्रभाग आहेत ज्यांनी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे मताधिक्य मिळवून दिले होते. हा अन्याय सहन न झाल्याने राजेंद्र जंजाळ कार्यालयातून रडत बाहेर पडले. त्यांचे अश्रू पाहून कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला

## काँग्रेसची बीएमसी साठी ८७ उमेदवारांची यादी जाहीर

### सर्वधर्मीयांना संधी देत जातीय समीकरण साधण्याचा प्रयत्न

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- काँग्रेसने मुंबई महापालिकेसाठी आपल्या 87 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यात ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात म्हणजे माहिम विधानसभा मतदारसंघातील वॉर्ड क्रमांक 192 मध्ये दीपक भिकाजी वाघमारे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे येथील सामना अधिक चुरशीचा होण्याची शक्यात आहे. मुंबई महापालिकेसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होणार आहेत. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आज आपल्या 87 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक - 2026 साठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येत आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन आणि शुभेच्छा. आपली मुंबई घडवूया, मुंबईच्या हितासाठी काँग्रेसला निवडूया, असे काँग्रेसने ही यादी जाहीर करताना आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.




## गाडगेबाबांचे समाजकार्य विद्यार्थ्यांसाठी जीवनात सातत्याने प्रेरणादायी- प्रा. राव

### तक्षशिला लॉ कॉलेज येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अमरावती -संत गाडगेबाबा हे थोर समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या जीवनातून स्वच्छता, समाजसेवा आणि मानवतावाद यांचा आदर्श घालून दिला. गावोगावी जाऊन त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि दारू, अंधश्रद्धा व सामाजिक दुर्गुणांविरुद्ध जनजागृती केली. भिक्षेतून मिळालेल्या पैशांतून त्यांनी धर्मशाळा, शाळा, रस्ते व विहिरी उभारण्याचे कार्य केले.

कर्मकांडाला विरोध करून त्यांनी माणुसकी, समता आणि श्रमप्रतिष्ठेचा संदेश दिला. समाजातील उपेक्षित घटकांच्या उत्थानासाठी त्यांनी अविरतपणे कार्य केले.



स्वच्छता, समाजसेवा आणि समतेचा संदेश देणारे गाडगेबाबांचे कार्य आजच्या समाजासाठी, तरुण पिढीसाठी आणि विषेशतः विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे,

असे प्रतिपादन श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीचे सीईओ प्रा. पी. आर. एस. राव यांनी केले.ते तक्षशिला विधी महाविद्यालय येथे संत गाडगेबाबा जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्याम तंतरपाळे, तर अतिथी म्हणून, प्रा. डॉ. राजेश देशमुख, प्रा. ॲड. विशाखा सोनटक्के, प्रा. ॲड. भारत ढोके, ॲड. हरीश निंभाळकर, ॲड. उज्वल सोनवणे, प्रा. स्वप्नील मानकर , प्रा. मेघा चिमणकर, प्रा. ज्योती टाले, प्रा. राधा काळे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश म्हस्के, सहा प्रा. दीपाली पडोळे, प्रा. डॉ. अंभोरे , प्रा. डॉ. खेडकर, प्रा. डॉ. शुद्धोधन कांबळे , प्रा. दीपाली गवई आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. राव म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा हे दोघेही राष्ट्राच्या समाज सुधारणेच्या परंपरेतील महत्त्वाचे समन्वयी व्यक्तिमत्त्व होते.

बाबासाहेबांनी सामाजिक समता, मानवाधिकार, शिक्षण आणि संविधानिक मार्गाने अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, तर गाडगेबाबांनी स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि करुणेच्या मूल्यांद्वारे समाजजागृती घडवली.

## दर महिन्याला ३ जि.प. अधिकारी, कर्मचारी 'वॉल ऑफ फेम'वर

### कार्यक्षमतेच्या सन्मानासाठी अमरावती झेडपीची अभिनव संकल्पना

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अमरावती -जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी एक अभिनव संकल्पना सुरू केली आहे. यानुसार, दर महिन्याला तीन उत्कृष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे फोटो 'वॉल ऑफ फेम'वर प्रदर्शित केले जातील. अमरावती जिल्हा परिषद हा प्रयोग राबवणारी शहरातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे.

या उपक्रमासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवड करताना काही निकष ठरवण्यात आले आहेत. यात सामान्य नागरिक आणि कार्यालयप्रमुखांनी सोपवलेली कामे वेळेत पूर्ण करणे, कार्यालयीन व्यवहार स्वच्छ व पारदर्शक ठेवणे आणि सेवा नियमांनुसार इतर जबाबदाऱ्या पार पाडणे यांचा समावेश आहे. जिल्हा



परिषदेमार्फत शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबवले जातात, ज्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते. त्यांच्या या प्रयत्नांचा गौरव करणे हा यामागील उद्देश आहे.

सीईओ संजीता महापात्र यांच्या मते, या उपक्रमामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि कार्यालयीन कार्यक्षमतेत वाढ होईल. 'नव्या वर्षात नवे काही' या संकल्पनेनुसार, हा उपक्रम जानेवारी महिन्यापासून सुरू करण्यात येणार आहे. 'बेस्ट एम्प्लॉई ऑफ द मंथ' म्हणून निवड झालेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचे छायाचित्र 'वॉल ऑफ फेम'वर प्रसिद्ध केले जाईल. यासाठी दर महिन्याला वेगवेगळ्या विभागांतील तीन कर्मचाऱ्यांची निवड केली जाईल.

या निवडीसाठी एक विशिष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. सुरुवातीला, संबंधित खातेप्रमुख त्यांच्या विभागातून प्रत्येकी तीन नावांची शिफारस करतील. सर्व खातेप्रमुखांकडून प्राप्त झालेल्या नावांचा एकत्रित विचार करून त्यातून अंतिम तीन नावांवर शिक्कामोर्तब केले जाईल. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कोणताही कर्मचारी स्वतःहूनही आपली माहिती सादर करू शकतो, ज्यासाठी क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## वैमानिक प्रशिक्षण केंद्रामुळे अर्थकारणाला मिळेल बळकटी

### विमानतळ विस्तारीकरणाचीही प्रक्रिया जोरात; तरुणांना कौशल्यानुसार उपलब्ध होईल संधी


दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला- एकीकडे शिवणी विमानतळाच्या रुंदीकरणाला गती मिळाली असून, दुसरीकडे आता शहरात वैमानिक प्रशिक्षण केंद्रामुळे रोजगारासह अर्थकारणाला बळकटी मिळणार आहे. आगामी वर्षात हे मुद्दे मार्गी लागणार असून, तरुणाईला त्यांच्या कौशल्यानुसार संधी उपलब्ध होणार आहे.

विमानतळ विस्तारीकरणाचा मुद्दा अनेक वर्षांपासून रखडला आहे. विस्तारीणाबाबत स्थानिक प्रशासन-शासन स्तरावर बैठका झाल्या. विधिमंडळाच्या अनेक अधिवेशानांमध्येही लोकप्रतिनिधींकडून चर्चा घडवून आणली. काहींनी सवालही उपस्थित केले होते. मात्र तरीही हा मुद्दा मार्गी लागला नाही. पश्चिम विदर्भातील हवाई वाहतुकीसाठी महत्त्वाचे असलेल्या या विमानतळाच्या धावपट्टीचा मुद्दा एक दशकापोही जास्त वर्षांपासून रखडला होता. दरम्यान काही दिवसांपूर्वी निधी मंजूर कण्यासह भूसंपादचा मार्गही मोकळा झाला. आता अकोल्यात पायलट ट्रेनिंग सेंटरही मंजूर झाले असून, याबाबतची प्रक्रिया सुरु झाली आहे.


विमान पायलट प्रशिक्षण केंद्रासाठी भाजपकडून अकोल्यातून मुख्यमंत्री व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात आला. केंद्र मंजूर झाल्याने विदर्भाच्या पश्चिम विदर्भाच्या युवकांना अकोल्यातच दर्जेदार वैमानिक प्रशिक्षणाची सोय होणार आहे. ट्रेनिंगसाठी अकोल्यातील विद्यार्थ्यांना मुंबई, चेन्नई अन्य ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही. तसेच अकोल्याचा विकासाला चालना मिळणार आहे.

याकडे तरुणाईचे लक्ष शिवणी विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले भूसंपादन आदेशात आदेश सामान्य प्रशासन विभागाने काही महत्त्वाच्या बाबी नमूद केल्या. धावपट्टीच्या विस्तारासाठी



अतिरिक्त २२.२४ हेक्टर आर क्षेत्र संपादित करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस भूसंपादन संस्था म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या जागेच्या संपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे, असे आदेशात म्हटले होते. आता पायलट ट्रेनिंगसाठी कोठे जागा मंजूर होते व पुढील प्रक्रिया केव्हा सुरू होते, याकडे तरुणाईचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाचे...



### नितीन गडकरींचा पर्यायी इंधनावर भर..

नागपूर : केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पर्यायी इंधनाचा अवलंब करण्यावर भर दिला आहे. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी वाहनचालकांना कठोर उत्सर्जन नियम लागू करण्याचा इशारा दिला. पर्यायी इंधनांचा वापर आता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गडकरी म्हणाले, "मी वाहतूक मंत्री आहे, दंडुका घेऊन बसलो आहे." पर्यायी इंधनाचा वापर न केल्यास युरो ६ सारखे कठोर उत्सर्जन नियम लागू केले जातील, असा दम त्यांनी भरला. त्यांच्या या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. पर्यायी इंधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार आर्थिक मदत करत आहे. ट्रॅक्टर कंपन्यांनी १००% इथेनॉल आणि सीएनजीवर चालणारे फ्लेक्स इंजिन ट्रॅक्टर विकसित केले आहेत. भविष्यात, बांधकाम उपकरणांना वित्तपुरवठा करणाऱ्या लोकांनी पर्यायी इंधन आणि जैवइंधन पर्याय निवडल्यास, त्यांना पाच टक्के अनुदान दिले जाईल. या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त प्रचार करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.अलीकडेच तीन ट्रक बाजारात आणले आहेत. यापैकी दोन ट्रकमध्ये डिझेल आणि पेट्रोल इंजिनमध्ये हायड्रोजन मिसळून वापरले जात आहे, तर एक ट्रक पूर्णपणे हायड्रोजन इंधनावर चालतो. बांधकाम आणि कृषी उपकरणांमध्येही असेच प्रयोग केले जात आहेत.देशाचे भविष्य पर्यायी इंधन आणि जैवइंधनाशी जोडलेले आहे. येणाऱ्या काळात भारताला प्रगतीपथावर नेणारा हाच मार्ग आहे, असेही गडकरींनी नमूद केले.


### श्री.क्षेत्र वाकोडी येथील शिवमदिरात कलेश यात्रेचा प्रवेश



दिव्य वतन / अनिल अडकिने

सावनेर -सम्पूर्ण भारत भर भ्रमन करत गायत्री परिवारा तर्फे वाकोडी येथील प्राचीन शिव मंदिरात गायत्री ज्योत व कलेश यात्रेचा प्रवेश २९ डिसेंबर ला दुपारी १२ वा. झाला. यात्रेत मोठ्या संख्येनी भक्तगण उपस्थित होते.भजन व दिंडीच्या गजरात सम्पूर्ण गावात मिरवणूक काढण्यात आली.या प्रसंगी ट्रस्ट चे अध्यक्ष देविदास मदनकर,सचिव अतुल बांगरे,रघुनंदन पराते,यादवराव कन्होलकर,सुभाष खोड़गडे, शंकर खोड़गडे,पुंडलिक पांडे, केवल गगाते,प्रकाश मांगे इत्यादी भक्तांनी यात्रेतील कलेश रथाचे स्वागत केले.

### ३1डिसेंबर पासून वर्धापन सोहळा व पालखी उत्सव



मौदा - मौदा येथील श्री साई सेवक परिवार चॅरिटेबल ट्रस्ट कडून श्री नगर मौदा येथील साई मंदिरात ३१ डिसेंबर पासून दहावा वर्धापन सोहळा व पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.३१ डिसेंबर ला सकाळी ७ वाजता अभिषेक पूजा व आरती ने या सोहळ्याची सुरवात करण्यात येईल. सकाळी ९ वाजता हवण, पारायण व सायंकाळी ५ वाजता सुन्दरकांड होईल.१ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता पासून संपूर्ण मौदा शहरातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून सायंकाळी ७ वाजता महाआरती ने समापन करण्यात येणार आहे. शुक्रवार २ जानेवारी ला सकाळी १० वाजता महाहवन होणार असून सायंकाळी पाच वाजता महा प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तसेच २ जानेवारी ला रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तरी मौदा येथील सर्व नागरिकांनी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर उत्तर नागपुरात भाजपला मोठा धक्का

## नागपुरातील बड्या नेत्यांचा तीनशे कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी







नागपूर- २९ डिसेंबर २०२५ ऐन महापालिका निवडणुकीमध्ये काँग्रेसने भाजपाला जोरदार धक्का दिलाय. उत्तर नागपुरातील दिग्गज नेत्यांनी भाजपची साथ सोडली. भारतीय जनता पार्टीचे सुनिता शंभू महल्ले यांनी काँग्रेसमध्ये आज प्रवेश केला.

त्यांनी तीनशेहून अधिक समर्थकांसह सोमवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी मंत्री डॉ. नितीन राऊत आणि आमदार विकास ठाकरे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची बऱ्याच जणांची इच्छा आहे. अनेकांनी ती बोलूनसुद्धा दाखवली आहे. त्यानुसार त्यांना प्रवेश दिला जात आहे.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वगुणांवर विश्वास ठेवून लोक पक्षात प्रवेश करण्यासाठी पुढे येत असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे महासचिव कुणाल राऊत, संजय दुबे, सचिव सुरेश जग्यासी, नागपूर शहर उपाध्यक्ष बंडोपंत टेंभूर्णे प्रामुख्याने उपस्थित होते. काँग्रेस पक्षाला शिव, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. यावेळी बोलतांना, काँग्रेस पक्षाला बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरु आणि महात्मा गांधींची विचारधारा आहे,

त्या पक्षात सहभागी होऊन निष्ठेने काम करून काँग्रेसची विचारधारा तळागाळात पोहोचवणार असल्याचे यावेळी सुनीता महल्ले म्हणाले.

यावेळी उपाध्यक्ष किर्ती साबळे, क्रिष्णा डोबले, निशांत हमरे, तिलक डोबले, ओमकार महल्ले, प्रफूल तेलंटे, भिमराव देवगडे, सचिन बलगर, अंकीत रिवेटकर, प्रशांत घोराडकर, बाळू महाजन यांच्यासह तीनशे जणांनी काँग्रेस पक्षात मध्ये प्रवेश केला.

प्रसंगी यादव पोटे पाटील, अतुल कोटेचा, ठाकूर जग्यासी, खेमचंद बालवानी, परमानंद लहरवानी, प्रकाश पटले, महेंद्र बोरकर, गोपाल रजवाडे, शशी ऊके यांच्या सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचे नागपुरात ठरले

## काँग्रेसला सर्वाधिक १२९, शरद पवार गट १२ अन् ठाकरे गटाला १०

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी



नागपूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित झाले आहे. या निर्णयानुसार, काँग्रेस सर्वाधिक 129 जागांवर निवडणूक लढवणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला अनुक्रमे 12 व 10 जागा सोडण्यात आल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसच्या 3 जागांवर तुतारीचे उमेदवार लढणार आहेत. याची अधिकृत घोषणा आज होण्याची शक्यता आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, काँग्रेसचे नागपूर शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या निवासस्थानी रविवारी रात्री महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे, माजी आमदार प्रकाश गजभिये, शेखर सावरबांधे, ठाकरे गटाचे लोकसभा प्रमुख सतीश हरडे, जिल्हाप्रमुख प्रमोद मानमोडे, किशोर कुमेरिया, काँग्रेस आमदार अभिजित वंजारी, गिरीश पांडव, बंटी शेळके, उमाकांत अग्निहोत्री, अतुल कोटेचा, शेख हुसैन आदी नेते उपस्थित होते.

प्रस्तुत बैठकीत राष्ट्रवादीने 24 जागांची मागणी केली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान 4 जागा पक्षाला सोडल्या जाव्यात असा आग्रह त्यांनी धरला. पण काँग्रेस नेते 10 जागांच्या पुढे सरकण्यास तयार नव्हते. यावेळी दोन्ही पक्षांनी आपापली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण हा तिढा सुटत नव्हता. शेवटी ही चर्चा थांबून हे पक्ष स्वबळाच्या दिशेने जातात की काय? अशी स्थिती निर्माण झाली. पण ऐनवेळी 12 जागांवर तडजोड झाली आणि मुद्दा निकाली झाला. शरद पवार गटाला आणखी झुकते माप देत काँग्रेसने आपल्या 3 जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार लढतील असा तोडगा या प्रकरणी काढण्यात आला.दुसरीकडे, ठाकरे गटाने काँग्रेसकडे 30 जागांची मागणी केली. पण त्यांना अवघ्या 10 जागा सोडण्यात आल्या. दुनेश्वर पेठे यांनी याविषयी एका वृत्तपत्राशी बोलताना सांगितले, आम्ही जास्त जागा मागितल्या, पण काँग्रेसने 10 हून अधिक जागा सोडता येणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका घेतली. त्यानंतर विधानसभानिहाय जागांवर चर्चा झाली.

# चंद्रपुरात दोन 'वारांच्या' भांडणात तिसऱ्याचा लाभ?

## भाजपमधील नाराजांवर काँग्रेसचा डोळा; वडेट्टीवार म्हणाले - तडजोड करून उमेदवारी देण्यास तयार

दिव्य वतन / प्रतिनिधी



चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित करण्यावरून भाजपचे दोन दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांच्यात सुरू झालेला वाद आता विकोपाला गेला आहे. या दोन 'वारांच्या' भांडणामुळे भाजपमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली असून, याचाच फायदा घेण्यासाठी काँग्रेसने आपली दारे उघडली आहेत. "दोन 'वारांच्या' भांडणात भाजपमधील अनेक इच्छुक आता काँग्रेसकडे डोकावून पाहत आहेत," असा खोचक टोला लगावत, आम्ही तडजोड करून नाराजांना उमेदवारी देण्यास तयार असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.

चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुकीत कोणाचे पारडे जड राहणार, यावरून मुनगंटीवार आणि जोरगेवार यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सुप्त संघर्ष सुरू होता. नुकत्याच झालेल्या पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा वाद उघडपणे समोर आला. शहरातील विविध प्रभागांमध्ये उमेदवारी देताना दोन्ही नेत्यांनी आपापल्या समर्थकांची आणि कट्टर कार्यकर्त्यांची नावे रेटून धरली. बहुतांश प्रभागांमध्ये दोघांनीही वेगवेगळ्या नावांसाठी शिफारस केल्यामुळे उमेदवारांची यादी अंतिम होऊ शकली नाही. वादावर कोणताही तोडगा न निघाल्याने पक्षाने आता पुढील दोन दिवसांत सर्व इच्छुक उमेदवारांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्वेक्षणाच्या निकालानंतरच अंतिम नावे निश्चित केली जाणार आहेत.

भाजपमधील या अंतर्गत कलहावर प्रतिक्रिया देताना विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, "भाजपमध्ये सध्या प्रचंड अस्वस्थता आहे. जे इच्छुक तिकिटासाठी आमच्याकडे संपर्क करत आहेत, त्यांच्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. मात्र, उमेदवारी देताना आम्ही संबंधित इच्छुकाची प्रतिमा आणि कामाचा आवाका असे महत्त्वाचे निकष लावणार आहोत. निवडून येण्याची क्षमता. ज्या ठिकाणी काँग्रेसची स्थिती थोडी कमकुवत आहे किंवा जिथे आम्हाला विजयाची खात्री कमी आहे, अशा ठिकाणी आम्ही भाजपच्या इच्छुकांसोबत तडजोड करून त्यांना उमेदवारी देण्यास तयार आहोत."

विजय वडेट्टीवार यांनी उघडपणे 'तडजोड' आणि 'इच्छुकांचे स्वागत' करण्याची भाषा केल्यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे. भाजपमधील जुन्या निष्ठावंतांना डावलले गेल्यास किंवा जोरगेवार-मुनगंटीवार वादात कोणाचा पत्ता कट झाल्यास, ते उमेदवार काँग्रेसचा हात धरण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीचे संपूर्ण गणित बदलू शकते.

# आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या अटी जे कोणते पक्ष मंजूर करेल त्याच पक्षाला ३ जानेवारी ला समर्थन देणार :नारायणराव बागडे

## आंरिमो कोणत्या पक्षासोबत जाणार तो निर्णय लवकरच जाहीर करणार : बागडे

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी




नागपूर : राज्यात होऊ घातलेल्या मनपाच्या निवडणुकीत कोणत्या पक्षाचे हात कुठे मजबूत करणार याचा निर्णय आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा नवीन वर्षात येत्या 3 जानेवारीला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने जाहीर करणार असे आवाहन यावेळी करण्यात आले. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील २९ महानगरपालिकेची रणधुमाळी सुरू झालेली आहे. ही निवडणूक कार्यकर्त्यांच्या हक्काची जाणीव करून देणारी आहे. या निवडणुकीत पक्षाचे बंधन कार्यकर्त्यांवर लादायचे नाही. जिल्हास्तरावर कार्यकर्त्यांना आम्ही मोकळे सोडलेले आहे. त्यांच्यावर निर्बंध घातले तर अन्याय होईल. राज्यातील विविध महानगरपालिका अध्यक्षांच्या अहवाल आंरिमो च्या मुख्यालयात पोहोचला आहे. आमच्यातील काही पक्ष नेते बळ नसतांना स्वबळाचा लपंडाव खेळत आहे. याचा फायदा फक्त नेत्यांच्या फायद्याचे आहे. यामुळे कार्यकर्त्यांच्या पदरी निराशाच येईल. कार्यकर्त्यांना स्वावलंबी करण्यासाठी कोणासोबत हात मिळवणी करावी हा निर्णय घेण्यासाठी त्यांना स्वतंत्र आंरिमो ने दिलेले आहे. अशी माहिती यावेळी दिली. आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या काही अटी आहे त्या अटी पुर्ण करण्या साठी कोणत्याही पक्षांनी मंजूर केल्यास त्यासोबतच आम्ही समर्थन देऊ असे पत्रकारांना सांगितले.

अटी : १) मुंबई चैतन्य भूमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला गती द्यावी. २) वरली स्मशानभूमी येथे माई रमाईचे स्मारक बनावे. ३) दादर रेल्वे स्टेशनला चैत्यभूमीचे नाव द्यावे. ४) पुणे जिल्ह्यातील नाव महात्मा फुले जिल्हा करावा. ५) भीमा कोरेगाव येथे राष्ट्रीय स्मारक व्हावे. ६) संभाजीनगर येथे शहीद भीमसैनिक स्मारक व्हावे. ७) नागपूर येथील अंबाझरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे नाव द्यावे.

# भाजपची 'गुप्त फॉर्म रणनीती', बंडखोरी टाळण्यासाठी भाजपची गुप्त उमेदवारी रणनीती, नव्या चेहऱ्यांना संधी

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी



नागपूर: नागपूर महानगरपालिका निवडणूक 2025 साठी भारतीय जनता पक्षाने अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यापूर्वीच इच्छुक उमेदवारांना अर्ज फॉर्म वाटप केले आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. बंडखोरी आणि पक्षांतर्गत असंतोष टाळण्यासाठी भाजपने अवलंबलेली ही 'गुप्त रणनीती' सध्या नागपुरात चर्चेचा विषय ठरत आहे. उमेदवारी जाहीर होण्याआधी अनेक इच्छुक उमेदवारांना अंधारात ठेवण्यात आल्याचे चित्र समोर आले आहे.

सोमवारी (29 डिसेंबर) भाजपकडून अनेक प्रभागांमध्ये उमेदवारी अर्जांचे फॉर्म वाटप करण्यात आले आहेत. मात्र, उमेदवारांची अधिकृत घोषणा न करता, काही निवडक उमेदवारांना अत्यंत गोपनीय पद्धतीने तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्येक प्रभागात एकापेक्षा अधिक इच्छुक उमेदवारांना तयारीत राहण्यास सांगण्यात आले होते. त्यामुळे शेवटपर्यंत कोणाला अधिकृत उमेदवारी मिळणार, याबाबत संभ्रम कायम होता. भा हे 'बी' फॉर्महीं अत्यंत गुप्तपणे देऊन, तत्काळ नामांकन अर्ज दाखल करण्याच्या सूचना उमेदवारांना दिल्या जाणार आहेत. सोमवारी जवळपास 50 च्या वर उमेदवारांना 'बी' फॉर्म चे वाटप करण्यात आले आहे.जपच्या निवडणूक प्रक्रियेनुसार, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी 'ए' आणि 'बी' हे दोन्ही फॉर्म आवश्यक असतात. सध्या अनेक प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांना केवळ 'ए' फॉर्म देण्यात आला आहे. तर, मंगळवारी (30 डिसेंबर) उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने, ज्यांना अधिकृत उमेदवार म्हणून निवडण्यात आले आहे, त्यांनाच शेवटच्या क्षणी 'बी' फॉर्म देण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

# मानिनी सखी मंचाच्या स्नेहमिलन सोहळ्यात महिलांची मोठी गर्दी

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी








नागपूर : मानिनी सखी मंचाच्या वतीने आयोजित स्नेहमिलन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. बेसा रोड मानेवाडा येथील शाहू लॉन येथे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सविताताई मोहनजी मते यांची उपस्थिती होती. यावेळी संघाचे पदाधिकारी अमोलजी पूसदकर, सीमाताई चव्हाण, भाजप प्रभाग क्रमांक ३४ च्या अध्यक्ष शुभांगीताई घ्यार, प्रभाग ३४ भाजपचे अध्यक्ष चंद्रकांत दाऊसकर, भाजपच्या महामंत्री अर्चनाताई बारई उपस्थित होत्या. तसेच आयोजक सरदार पटेल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुनील मानेकर यांनी प्रास्ताविक करत मानिनी सखी मंचच्या स्थापनेपासूनच्या प्रवासाबद्दलची माहिती देत आपला जीवन प्रवास उलगडला. मानिनी सखी मंचच्या अध्यक्ष सौ. अर्पणा सुनील मानेकर यांचीही विशेष उपस्थिती होती. यावेळी त्यांनी नृत्य स्पर्धेचे संचालन केले. स्नेहमिलन सोहळ्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांना आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळाल्याचे प्रतिपादन सौ. सविता मोहन मते यांनी केले.या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या दिशेने पुढे जाण्याची संधी मिळणार असल्याचे मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते 'देणाऱ्यांच्या रांगेतील माणूस' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याचप्रसंगी मानिनी सखी मंचचे थीम साँगही लोकार्पित करण्यात आले. यासोबतच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ड्रेस डिझायनिंग प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या कल्पना शिरीष ढोले, शुभांगी सचिन पाटणे, सुवर्णा लष्करे व स्वामिनी विजय तभाने यांना प्रोत्साहन म्हणून शिवणयंत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या रूपा बिपिन साळवे, पायल पारधी आणि श्वेता महेंद्र बडवाई यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याशिवाय मेहंदी कला प्रशिक्षणात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या निकिता तळवेकर, ऋतुजा बारापात्रे व सुवर्णा कनोजे यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमात सहभागी महिलांसाठी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांच्या कला, कौशल्य व आत्मविश्वासाला व्यासपीठ देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी मानिनी सखी मंच करत असलेल्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. यावेळी मानिनी सखी मंचच्या कार्याचा गौरव करत महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका ठाकरे यांनी केले.



## महत्त्वाचे...

### संत निरंकारी मिशन रक्तदान शिबिरात १२५.... दात्यांचे रक्तदान



नांदुरा- येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक नगर परिषद टाऊन हॉल येथे रक्तदान शिबिरामध्ये 125 दात्यांनी उत्साह आणि समर्पण भावनेने स्वेच्छा रक्तदान करुन मानवकल्याणामध्ये आपला सहयोग दिला. या शिबिराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाचे जिल्हा संयोजक परम आदरणीय संतोषजी शेगोकार सुधीरभाऊ मुरेकर न.प.सदस्य नांदुरा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. चंद्रशेखर आझाद मंडळाचे सोनू जयस्वाल पत्रकार गणेश आसोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नांदुरा ब्रांचचे मुखी साजनदासजी यांनी या रक्तदान शिबिराचे सुंदर नियोजन केले तसेच आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत आणि आभारही व्यक्त केले .

संत निरंकारी मंडळाचे सर्व सेवादल जवान आणि बहिणीनी मिळून सुंदर व्यवस्था करण्यामध्ये योगदान दिले. त्याचप्रमाणे सर्व तज्ञ टीम डॉक्टर यांनीही सुंदर योगदान या ठिकाणी दिले संपूर्ण रक्तसंकलन उपजिल्हा सामान्य रुग्णालय खामगाव शासकीय लेडी हार्डिंग अकोला रक्तपेढी यांच्या वतीने करण्यात आले.युगप्रवजीर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्यबोधाच्या माध्यमातून समाजाला समाज अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथांपासून मुक्त करुन नशमुक्ती, साधे विवाह आणि युवावर्गाला सकारात्मक विचारांशी जोडणे यांसारख्य लोककल्याणकारी अभियांनाची प्रेरक सुरवात केली. त्यांचे पावन मार्गदर्शन पुढे चालवत बाबा हरदेवसिंहजी यांनी “रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको” हा अमर संदेश देऊन रक्तदानाला मिशनच्या आध्यात्मिक सेवेचे अभिन्न अंग बनवले.

### 11 जानेवारीला 'शिवरायांचे आठवावे रूप' या भव्य ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन



नांदुरा-मराठी मातीच्या संस्कारांचा सोहळा,मातृत्वाच्या सर्वोच्च मूल्यांचा सोहळा आणि अठरापगड जातींना एकत्र बांधणारा सांस्कृतिक सोहळा म्हणजे राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ जन्मोत्सव सोहळा.माँसाहेब जिजाऊं जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने नांदुरा नगरीत जिजाऊ जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला म्हणजे 11 जानेवारी 2026 ला सायंकाळी ठीक 6 वाजता तालुका क्रीडा संकुल, दूध डेअरी रोड, शासकीय आयटीआय कॉलेजजवळ, `शिवरायांचे आठवावे रूप` या भव्य दिव्य ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महानाट्यात आऊसाहेब जिजाऊंच्या सानिध्यात शिवजन्मापूर्वीच्या काळापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्याराज्याभिषेकापर्यंतचा तेजस्वी, प्रेरणादायी आणि ज्वलंत इतिहास रंगमंचावर उलगडला जाणार आहे.शिवाई प्रोडक्शन ओझर, नाशिक यांच्या ७० हून अधिक कलावंतांच्या संचातून हे महानाट्य सादर होणार असून प्रेक्षकांना प्रत्यक्ष इतिहासाचा अनुभव देणारे हे सादरीकरण ठरणार आहे. या भव्य कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुलुख मैदानी तोफ, सुप्रसिद्ध शिवव्याख्याते मा. श्री. यशवंत दादा गोसावी यांच्या हस्ते होणार आहे. तसेच महाराष्ट्राच्या शाहीर परंपरेचा नरसिंह म्हणून ओळखले जाणारे मा. श्री. शाहीर स्वप्निल दादा डुंबरे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. या महानाट्य सोहळ्याचे आयोजन पाईक आऊसाहेब जिजाऊंचे यांच्या वतीने करण्यात आले आहे.हा सोहळा कोणत्याही संघटना, संस्था किंवा पक्षाचा नसून, आपल्या मातीतील महान मातृशक्ती – आऊसाहेब जिजाऊ यांना वंदन करणारा सर्वसामान्य जनतेचा, समाजाचा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. नांदुरा तालुक्यातील सर्व नागरिकांनी आपल्या घरचा सोहळा समजून कुटुंबासह उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# समृद्धी महामार्गावर थरकाप !

## खासदार प्रतापराव जाधव यांच्या कारचा भीषण अपघात; तिघे गंभीर


दिव्य वतन /प्रतिनिधी

बुलढाणा - बुलढाण्याचे खासदार तथा केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कारला काल रात्री समृद्धी महामार्गावर वाशिम जिल्ह्यातील मालेगावजवळ भीषण अपघात झाला. हा अपघात इतका जबरदस्त होता की काही काळ महामार्गावर एकच खळबळ उडाली.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे नागपूर विमानतळावर पोहोचून गेल्यानंतर त्यांच्या ताफ्यातील कारमधून हे तिघे मंत्री जाधव यांचे अंगरक्षक, सहकारी आणि कारचालक मेहकरकडे परतत असताना हा अपघात घडला. रात्री उशिरा झालेल्या या अपघातामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कारमधील तिघेही जण गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच मदतकार्याला वेग देण्यात आला. जखमींना तातडीने वाशिम येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.समृद्धी महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या घटनेमुळे राजकीय व प्रशासकीय वर्तुळातही चिंता व्यक्त केली जात आहे. सुदैवाने केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव या अपघातात प्रवासात नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे.



## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत शिराळा येथे ग्रामस्वच्छता

दिव्य वतन /प्रतिनिधी



खामगाव:महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत खामगाव तालुक्यातील ग्राम शिराळा येथे रविवार दिनांक 28डिसेंबर ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे. ही चळवळ लोक चळवळ व्हावी. यासाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी. शिवशंकर भारसाकळे, खामगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी चंदनसिंह राजपूत,अतिरिक्त गटविकास अधिकारी शेख साहेब इत्यादी अधिकारी वर्गासह ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर , बचत गटाच्या महिला सदस्य,यांच्यासह शासनामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध स्तरावरील कर्मचाऱ्यांनी सदर ग्रामस्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये गावातील रस्ते, नाल्या, गटारे, साफ करण्यात आले. त्यासोबतच ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करण्यात आला. पाण्याचा निचरा व्हावा यासाठी लोकांना सूचना देण्यात आल्या. प्लास्टिकचा वापर टाळण्याची सुद्धा आवाहन केल्या गेले. गाव प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्व गावाने कटिबद्ध असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमांमध्ये. भारसाकळे यांनी उपस्थितांना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची उद्दिष्टे आणि त्या अभियाना अंतर्गत कोणता गावाला होणारा फायदा सांगितला .त्यात असणाऱ्या विविध प्रकारच्या तरतुदी लोकसभागाच्या माध्यमातून कशा पूर्ण करावयाच्या आहेत. इत्यादी बाबींवर सखोल मार्गदर्शन केले.

सोबतच लोकांसोबत संवाद साधून शासन आणि प्रशासन कसे त्यांच्या मदतीला येते. त्यासाठी जनतेने सुद्धा प्रतिसाद देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. सदर कार्यक्रमासाठी लाखनवाडा येथून ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गुफरान खान, प्रकाश इंगळे, गोपाल बावणे उपस्थित होते. याप्रसंगी शिराळा गावातील सरपंच प्रतिभाताई तायडे रतन मारकड,संतोष तायडे,रामराव तायडे,शेषराव तायडे,देवेंद्र चोरमले, कुंदन कोकरे,जनार्धन पंखुले, ,सुनंदा मोरे,ज्योती वानखडे,राधाताई पंखुले,नितााताई वायसे,सुवर्णाताई कोकरे,कारंडे ताई,सोनू वानखडे,अजय वानखडे,अनिल वायसे, दशरथ तायडे,जीवन साळुंखे,दादाराव ठोंबरे,गोपाल् अनुसे,अरुण ठोंबरे,अजय हटकर,संदीप हटकर,पवन हटकर,ग्रामसेवक शिंदे साहेब,अंतरीक्ष संतोष,संजय तायडे,संजय डरंगे,हरिओम डरंगे इत्यादी नागरिकांनी कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन अशोक संताराम तायडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अरुण ठोंबरे यांनी केले. कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## अन्यथा 'लाडकी बहीण 'चा लाभ बंद!

### भर चौकात दवंडी, महिलांचा गोंधळ

दिव्य वतन /प्रतिनिधी

बुलढाणा: बचतगटांत नाव नसलेल्या महिलांनी तातडीने आपले नाव नोंदवावे, अन्यथा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद केला जाईल.

शिवाय इतर शासकीय योजनांचा लाभही थांबवला जाईल, अशी अजब सक्ती खामगाव तालुक्यातील काही गावांमध्ये करण्यात आल्याने महिलांचा गोंधळ उडाला आहे. ग्रामपंचायतीमार्फत दवंडी देऊन यासंदर्भातील निर्णय सांगण्यात आला आहे.

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कुटुंब समावेशनाचे काम केले जात आहे. या माध्यमातून अधिकाधिक महिला समूहांना समाविष्ट करून घेण्यासाठी गावांमध्ये दवंडी दिली जात आहे. मात्र ही दवंडी देताना बचतगटात ज्या महिलेचे नाव नाही, अशांचा लाडकी बहीण योजनेचा लाभ थांबवला जाईल.

तसेच काही ग्रामपंचायतींनी रेशनकार्डमधून नाव वगळण्यात येईल, शासनाच्या विविध योजनाही बंद केल्या जातील, असा दवंडीचा मजकूर लिहून दिला गेला आहे.




खामगाव तालुक्यातील फत्तेपूर, लाखनवाडा, पळशी खुर्द, संभापूर, पळशी शहापूरसह सात ते आठ गावांमध्ये ही दवंडी देण्यात आल्याची माहिती आहे. बचतगटांचे काम करणाऱ्या ग्राम सखींना बचतगट वाढीसाठी कार्य करावे लागते. त्यांनी ग्रामसेवकांचा आधार घेतल्याचे सांगितले जात आहे. तर शासकीय काम असल्याने ग्रामसखींना केलेली ही मदत आहे की, ग्रामसेवकांनी महिलांच्या सहभागासाठी दिलेली दवंडी प्रशासकीय टार्गेट तर नाही ना, अशीही चर्चा ग्रामीण भागात रंगली आहे.

## लोकशाही, संविधान संरक्षणासाठी काँग्रेसची गरज, राहुल बोंद्रे यांचे प्रतिपादन

दिव्य वतन /प्रतिनिधी



बुलडाणा- काँग्रेस हा केवळ पक्ष नसून एक व्यापक विचारधारा आहे. या विचारधारेतूनच देशाला स्वातंत्र्य मिळाले असून, देशाचे स्वातंत्र्य, लोकशाही आणि संविधान अबाधित राखण्यासाठी आजही काँग्रेस विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी केले.

रविवार २८ डिसेंबर रोजी काँग्रेसच्या १४० व्या स्थापना दिनानिमित्त बुलडाणा येथील जयस्तंभ चौकातील काँग्रेस मुख्यालयात जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. प्रारंभी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी यांना अभिवादन करण्यात आले. राहुल बोंद्रे म्हणाले की, काँग्रेसने देशाला केवळ स्वातंत्र्यच दिले नाही तर सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षतेची मूल्ये रुजवली. आज देशासमोर असलेल्या आर्थिक, सामाजिक आणि लोकशाहीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी काँग्रेसची विचारधारा अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

## अतिवृष्टी व कर्जबाजारीपणाचा फटका भानापूर येथील तरुण शेतकऱ्याची आत्महत्या, परिसरात हळहळ

दिव्य वतन /प्रतिनिधी



मेहकर- बुलढाणा जिल्ह्यातील सुलतानपूरपासून जवळ असलेल्या भानापूर गावातील सुशिक्षित तरुण शेतकरी अर्जुन कचरुबा आव्हाळे (वय ३५) यांनी आर्थिक विवंचना व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शेतकऱ्यांच्या गंभीर आर्थिक परिस्थितीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मृतक अर्जुन आव्हाळे यांच्याकडे सुमारे ५८ गुंठे शेती होती. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतातील संपूर्ण पीक नष्ट झाले होते. पीक हातचे गेल्याने सेंट्रल बँकेचे कर्ज तसेच खासगी सावकाराकडील उसनवारीची परतफेड करणे अशक्य झाले होते. या आर्थिक अडचणींमुळे ते गेल्या काही दिवसांपासून तीव्र मानसिक तणावाखाली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास गावालगत असलेल्या स्वतःच्या शेतातील गोठ्यात त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने मेहकर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याच दिवशी सायंकाळी सुमारे ८ वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. अर्जुन आव्हाळे यांच्या पश्चात पत्नी, आई, एक लहान मुलगा व भाऊ असा परिवार आहे.

## रनाळा वरिष्ठ नागरिक मनोरंजन कक्षाच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन

### पंकज साबळे सरपंच यांच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण काम

दिव्य वतन /प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळा, आराम व सामाजिक संवादासाठी उभारण्यात येणाऱ्या वरिष्ठ नागरिक मनोरंजन कक्षाच्या भूमिपूजन सोहळ्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे आमदार मा. ना. कृपालजी तुमाने साहेब यांच्या निधीअंतर्गत १५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाल्यामुळे हा उपक्रम प्रत्यक्षात साकार होत आहे. या मनोरंजन कक्षासाठी श्री नागोरावजी साबळे साहेब यांनी जागा उपलब्ध करून दिली आहे. सरपंच श्री पंकज साबळे यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाले, तर या कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री नागोरावजी साबळे साहेब यांनी भूषविले.

यावेळी येरखेडा नगरपंचायतीचे अध्यक्ष श्री राजकिरणजी बारवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री प्रदीप सपाटे व श्री शिरपाल डोरले यांची प्रमुख उपस्थिती होती.





हा कार्यक्रम रविवार, दिनांक २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता रेल्वे चौकीजवळ पार पडला. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर शशांकर, उपाध्यक्ष तुकाराम ठवकर, सचिव गणेश सपाटे, दिव्यांग फाउंडेशनचे सचिव बॉबी महेंद्र उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सदाशिव पुडके यांनी केले.तसेच मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये दशरथ देशमुख, नरेंद्र कुथे, अनिल संगेवार, विजय क्षीरसागर, बाबूराव नाखले, निर्गुण पटले, अशोक सहारे, मारुती इराबत्तीवार, तुलसीराम झाडे, सुभाष उरकुडे, कोविद तलेकर, अशोक ठाकरे, गजानन कुकडे, सुभाष डवले, सुनील भुझाडे यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.

या मनोरंजन कक्षामध्ये टीव्ही, Wi-Fi सुविधा, कराओके सिस्टम, वर्तमानपत्रे, टेबल-खुर्च्या आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार असून, यामुळे ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा व सामाजिक संवादासाठी एक सुरक्षित व आनंददायी व्यासपीठ मिळणार आहे.या उपक्रमामुळे गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद, सामाजिक एकोपा व सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# चंद्रपुरात बरांज मोकासा येथे केपीसीएल कंपनीची मनमानी!

दिव्य वतन /किशोर कारंजेकर

चंद्रपूर जिल्हा म्हणजे कोळशाची खाण, पण याच कोळशाने आता स्थानिकांचे जगणे कठीण केले आहे. भद्रावती तालुक्यातील `बरांज मोकासा` या गावातून एक संतापजनक वास्तव समोर येत आहे. एकीकडे गावकऱ्यांच्या पुनर्वसनाचा पत्ता नाही, हाताला काम नाही, मात्र दुसरीकडे केपीसीएल (KPCL) कंपनीने वन जमिनीतून अवैध कोळसा उपसा करण्याचा सपाटा लावला आहे. जिल्हा प्रशासन आणि वन विभाग झोपले आहे की त्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायला लावले जात आहे? पाहुयात आमचा हा विशेष रिपोर्ट..."

पुनर्वसन रखडले, रोजगार हु कला; केपीसीएलचा `कोळसा` मात्र जोरात! चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील बरांज मोकासा हे गाव सध्या अस्तित्वाच्या लढाईला सामोरे जात आहे. केपीसीएल कंपनीच्या को ळसा खाणीमुळे गावकरी त्रस्त झाले असून, कंपनीच्या म नमानी कारभाराने सर्व सीमा ओ लांडल्या आहेत. गावाचे पु नर्वसन करणे आणि स्थानिक सुशिक्षित तरुणांना रोजगार देणे हे कंपनीचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य असताना, त्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.








वन ज मिनीवर डाका? सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, कंपनीने आपली हद्द ओलांडून वन विभागाच्या जमिनीतून मोठ्या प्रमाणात अवैध कोळसा उत्खनन सुरू ठेवले आहे. लाखो मेट्रिक टन कोळसा नियमांची पायमल्ली करून काढला जात आहे. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून गावच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होत आहे. प्रशासनाचे संशयास्पद मौन गावकऱ्यांनी या अन्यायाविरुद्ध वेळोवेळी आवाज उठवला आहे. व न विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि खनिकर्म वि भा ग यांच्याकडे पुराव्यांसह त क्रारी करण्यात आल्या. अनेक वेळा आंदोलने, धरणे आणि निवेदने देण्यात आली. प रंतु, इतके होऊनही प्रशासन कं पनीवर कोणतीही ठोस का रवाई करताना दिसत नाही. उल ट, कंपनीचे उत्खनन अ धिक जोमाने सुरू असल्याने "शासनाचा कंपनीला वरदहस्त आहे का?" असा सवाल आता विचारला जात आहे. गावकऱ्यांची व्यथा " आम्ही आमच्या जमिनी दिल्या, पण आज आमचीच मुले बे रो जगार आहेत. गावात धूळ आ णि प्रदूषणाशिवाय काहीच उर लेले नाही. आमचे पुनर्वसन रखड ले आहे आणि आमची जमीन ओरबडली जात आहे," अशा भावना हताश झालेल्या गावकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. खाणकाम बंद व्हावे किंवा न्याय मिळावा यासाठी गावकरी शेवटची लढाई लढण्याच्या तयारीत आहेत. एकीकडे विकास आणि ऊर्जेच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसऱ्या बाजूला एका संपूर्ण गावाला वाऱ्यावर सोडणारी ही विकासनीती नक्की कोणासाठी? आता तरी जिल्हा प्रशासन या `अवैध` कारभाराला लगाम घालणार की केपीसीएलची मनमानी अशीच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुंबई पालिकेचं सत्तासमीकरण बदलणार?

मुंबई महापालिका निवडणुकीतील राजकारण निवडणुकीपूर्वीच चांगलच तापत आहे. निवडणुकीआधीच राजकारणात मोठा स्फोट झाला आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात ऐतिहासिक युतीची अधिकृत घोषणा झाली आहे.या एका निर्णयामुळे मुंबईच्या सत्तासमीकरणात मोठा बदल होण्याची चिन्हं दिसत आहेत. राज्यातील 29 महानगरपालिकांसाठी एकाच दिवशी मतदान होणार असलं,तरी संपूर्ण राज्याचं लक्ष मुंबई महानगरपालिकेवर केंद्रित आहे. कारण मुंबईची निवडणूक ही केवळ महापालिकेची नसून, ती राज्याच्या राजकारणाची दिशा ठरवणारी लढाई मानली जाते. आत्तापर्यंत चित्र स्पष्ट होतं. एकीकडे भाजपा आणि शिंदे गट एकत्र येऊन विकास आणि हिंदुत्व या मुद्द्यांवर निवडणूक लढवत आहेत. दुसरीकडे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर हातमिळवणी केली आहे.

या युतीसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार गटही आहे. मात्र या सगळ्या राजकीय समीकरणांमध्ये काँग्रेसने अचानक मोठी चाल खेळली आहे. दलित, बहुजन आणि अल्पसंख्याक मतदारांवर प्रभाव असलेल्या वंचित बहुजन आघाडीशी काँग्रेसने युती केली आहे.

मुंबईतील टिळक भवनात ही युती अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. या युतीअंतर्गत मुंबई महापालिकेच्या एकूण 227 जागांपैकी 165 जागा काँग्रेस लढवणार आहे, तर 62 जागा वंचित बहुजन आघाडी लढवणार आहे. ही केवळ जागावाटपाची घोषणा नाही, तर मुंबईच्या राजकारणात तिसऱ्या शक्तिशाली पर्यायाची एंट्री आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर दलित आणि बहुजन मतदारांमध्ये मोठा प्रभाव ठेवतात. तर काँग्रेसकडे अल्पसंख्याक, मध्यमवर्गीय आणि संविधानवादी मतदारांचा आधार आहे. ही दोन मतांची समीकरणं एकत्र आल्याने मुंबईतील अनेक वॉर्डमध्ये मतविभाजनाचं चित्र पूर्णपणे बदलू शकतं. याचा सर्वात मोठा परिणाम होऊ शकतो तो भाजपा आणि शिंदे गटावर. कारण आतापर्यंत विखुरलेला असलेला दलित–बहुजन मतदार आता एका दिशेने जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः उत्तर मुंबई, मध्य मुंबई आणि पूर्व उपनगरातील काही भागांमध्ये वंचितचा प्रभाव मोठा मानला जातो. जर हा मतदार काँग्रेस-वंचित आघाडीकडे वळला, तर महायुतीसाठी ही निवडणूक अधिक अवघड होणार आहे. दुसरीकडे ठाकरे गट आणि मनसेसमोरही अडचणी वाढू शकतात. कारण ठाकरे गटाला आतापर्यंत दलित-बहुजन मतदारांचा एक वर्ग पाठिंबा देत होता. मात्र आता वंचित काँग्रेससोबत आल्याने हा मतदार पुन्हा आपल्या मूळ राजकीय प्रवाहाकडे वळण्याची शक्यता आहे. याचा थेट फटका ठाकरे गटाच्या मतांवर बसू शकतो, आणि काही शहरी भागांमध्ये मनसेलाही याची झळ पोहोचू शकते. थोडं आकड्यांमध्ये पाहिलं, तर 2017 च्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसला सुमारे 16 टक्के मते मिळाली होती. भाजपाला 27 टक्के, तर शिवसेनेला जवळपास 28 टक्के मते मिळाली होती. आता वंचितसोबत युती झाल्याने काँग्रेस आणि वंचित यांना मिळून 20 ते 25 टक्के मतं मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर हे गणित प्रत्यक्षात उतरलं, तर ही आघाडी सत्तास्थापनेत किंगमेकर ठरू शकते. याचाच अर्थ असा की मुंबई महापालिकेची ही निवडणूक फक्त तिहेरी नाही, तर चतुःसूत्री लढत ठरण्याची शक्यता आहे. वंचित–काँग्रेस युती, भाजपा–शिंदे गट, ठाकरे गट–मनसे, आणि राष्ट्रवादी शरद पवार गट... या सगळ्यांमध्ये मुंबईचा मतदार नेमका कुणाच्या बाजूने झुकणार, हे शेवटच्या टप्प्यापर्यंत स्पष्ट होणार नाही. एक मात्र नक्की... वंचित आणि काँग्रेसची युती ही मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतील सर्वात मोठी राजकीय घडामोड ठरली आहे. आणि ही युती मुंबईच्या सत्तेची दिशा बदलणार की नाही, हे निकालाच्या दिवशीच स्पष्ट होणार आहे.

# वि.का.राजवाडे:महाराष्ट्राच्या विचारविश्वात दरारा, दबदबा व धाक!

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्य इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे साधन मानले जाते. सविस्तर माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींच्या लेखातून... संपादक.

सन १८९८ साली त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. दि. ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली. राजवाडे म्हणायचे- ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीला हपापलेला नाही.

वि.का.राजवाडे यांचा जन्म महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील वरसई येथे दि.२४ जून १८६३ रोजी झाला. बीएपर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले. त्यांच्या जन्माच्या वर्षाबाबत थोडा गोंधळ झालेला दिसतो. त्यांच्याविषयीच्या विविध लेखनांत त्यांचे जन्मवर्ष वेगवेगळे दिलेले आढळते. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर द.वा.पोतदार यांनी केसरीत लिहिलेल्या लेखात त्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८६ अशी नोंदवलेली आढळते. यानुसार इ.स.१२ जुलै १८६४ हा दिनांक मिळतो. मात्र त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रकाशित झालेल्या ब्राह्मण-पत्रिकेच्या राजवाडे तिलांजली अंकात वा.दा. मुंडले यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, त्यानुसार राजवाडे यांनी मुंडल्यांना आपला जन्मशक १७८५ असा सांगितला होता. त्याबाबत मुंडले यांनी पोतदारांकडे विचारणा केली आणि राजवाड्यांचे थोरले बंधू वैजनाथपंतांकडे विचारणा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे विचारणा केली असता राजवाडे यांची एक जन्मपत्रिका वैजनाथपंतांनी पोतदारांना उपलब्ध करून दिली. ती मुंडलेंच्या लेखात छापली असून त्यावर राजवाड्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८५ अशी नोंदवलेली आहे. इसवी सनानुसार हा दिनांक २४ जून १८६३ असा आहे. दत्तोपंत पोतदार यांनीही नंतरच्या काळात याच तिथीचा उल्लेख केलेला आढळतो. याव्यतिरिक्त दि.१२ जुलै १८६३ आणि दि.२४ जुलै १८६३ असे दोन दिनांक राजवाडे त्यांच्या जन्मतारखा म्हणून नोंदवलेल्या आढळतात. मात्र त्यांचे आधार नोंदवलेले आढळत नाहीत. त्यामुळे उपलब्ध पुरावे पाहता आषाढ शु.८ शके १७८५ अर्थात दि.२४ जून १८६३ हाच त्यांचा खरा जन्मदिनांक असावा, असे म्हणता येते.

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही. त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. महिकावतीची बखर आणि राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन केले. मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली. त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. ते संपादनांपेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही त्यांनी अविश्रांत कष्ट घेऊन ऋणी केले. प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यावाचून पर्यायच नव्हता. त्यांनी लिहिलेली राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकांबद्दल म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. ते आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते. त्यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के.सी.ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते. नंतरही इतिहास संशोधक त्र्यं.शं.शेजवलकर यांनी राजवाडेंच्या मर्यादा स्पष्ट केल्या. तथापि या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी त्यांचे वाक्य न् वाक्य ब्रह्मवाक्य मानणारा एक वर्ग अस्तित्वात होता. विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचे स्थान अबाधित राहिले.

इतिहासकार राजवाडे हे बुद्धिमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यामुळे साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे. मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यायचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखवला पाहिजे. काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग वा ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते. अंतिम चित्रण, इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे परिचित आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधने असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हेत, असे त्यांचे मत होते. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. अशा या थोर इतिहासाचार्यांचे दि.३१ डिसेंबर १९२६ रोजी निधन झाले. !! राजवाडेंच्या अचाट अविस्मरणीय स्मृतींना विनम्र अभिवादन !!

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
द्वारा-श्रीगुरूदेवप्रार्थनामंदिराजवळ,
मु.रामनगरवॉर्डनं.२०,गडचिरोली.
ता.जि.गडचिरोली,मो.९४२३७१४८८३.
इमेल- krishnadas.nirankari@gmail.com

# विश्व ओळखावे आपणावरून | आपणाची विश्वघटक जाणं |

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित 'ग्रामगीता' हा ग्रंथ आजच्या काळातील अनमोल ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथातून महाराजांनी आपल्या साध्या परंतु, मनाला भिडणाऱ्या व प्रत्येकाला चिंतन करायला लावणाऱ्या ओव्यातून सुंदर आणि स्वच्छ ग्राम निर्माणाचा संदेश दिलेला आहे. महाराजांच्या मते या महाकाय पृथ्वीचा मूळ घटक गावच आहे. अर्थातच गाव जर सुंदर असेल तर देश, विश्व हे संपूर्ण ब्रह्मांड सुंदर होईल. आपल्याला विश्वाची ओळख करून विश्वाचं रहस्य जाणून घ्यायचं असेल तर प्रथमतः विश्व स्वतःवरून ओळखावे कारण आपण स्वतःच त्या सुंदर विश्वाचा घटक आहोत. या विश्वाच्या सुंदर रचनेचं सूत्र प्रस्तुत ओवीतून महाराजांनी अत्यंत सुंदर पद्धतीने सांगितलेला आहे.


विश्व ओळखावे आपणावरून | आपणाची विश्वघटक जाणं | व्यक्तीपासूनि कुटुंब निर्माण | कुटुंबापुढे समाज आपला ||

विश्वाच्या रहस्याचा उलगडा करताना आपण स्वतःला विसरता कामा नये. या विश्वातील प्रत्येक गोष्टीची सुरुवात ही स्वतःपासूनच होते. ज्याप्रमाणे चांगल्या कामाची सुरुवात ही स्वतःपासून करावी लागते. असे केल्यास जग सुंदर बनेल! स्वतःला, कुटुंबाला, समाजाला व गावाला सुधारल्याशिवाय जग कदापी सुंदर बनू शकत नाही. जग सुंदर बनविण्याचा विचार व्यक्त करताना आपण सोयीस्करपणे स्वतःला मात्र विसरतो.

समाजापुढे ग्राम आहे|
ग्रामापुढे देश राहे|
देश मिळोनी ब्रम्हांड होय |
गती गतीने जवळ ते ||

प्रस्तुत ओवीतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामाची निर्मिती समाजातूनच होते. हा देश सुंदर, सुजला- सुफलाम बनवायचा असेल तर सगळ्यात अगोदर गाव सुंदर व्हायला हवे. गावातूनच देशाची व देशातूनच ब्रम्हांडाची निर्मिती होते. गाव हा देशाचा आरसा आहे. खेडी समृद्ध झाल्याशिवाय देश समृद्ध होणार नाही. गावामध्ये वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य व यासारख्या अनेक जीवन उपयोगी सोयी सुविधा निर्माण करून खेडी समृद्ध करावी लागतील. कारण ,खेड्यांच्या विकासातच देशाचा विकास दडलेला आहे. हाच आशय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ओवीतून व्यक्त होतो.

मानव मात्राचे प्रथम माहेर |
आपले गाव त्यातील घर |
यातूनी प्रगती करीत सुंदर |
पुढे जावे विश्वाच्या ||



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी देशाच्याच नव्हे तर विश्वाच्या विकासाचे मूळ आपले घर आणि गाव असल्याचे सांगितले आहे. व्यक्तीच्या सामाजिक वर्तनाची सुरुवात ही मुळात कुटुंबातून अर्थातच घरातून होते. गाव आणि त्यातील घराला राष्ट्रसंत मानव मात्रांचे प्रथम माहेर असे म्हणतात. गाव आणि घर जर सर्वांगाने समृद्ध असेल तर निश्चितच संपूर्ण प्राणी मात्राचे देशाच्या, विश्वाच्या दिशेने पडणारे पाऊल समृद्धीचेच असेल. घर, गाव, देश व विश्वाची प्रगती करणारा कोण आहे तर तो मानव आहे. या सर्व घटकांची प्रगती साध्य करण्यासाठी 'मानवाचे वर्तन' हेच मूळ आहे. असाच आशय राष्ट्रसंत आपल्या खालील ओवीतून सांगतात.

प्रथम पाया मानव- वर्तन |
यास करावे उत्तम जतन |
गाव करावे सर्वांगपूर्ण |
आदर्श चित्र विश्वाचे ||

गाव सर्वांगपूर्ण करणारे कोण? तर, ते म्हणजे त्या गावातील लोक. गावातील लोकांचे आचार-विचार, वर्तन, वाणी, सामाजिक ऋण फेडण्याची भावना, निस्वार्थ वृत्ती, गावाप्रती समर्पण, औदार्य, दातृत्व इत्यादी चांगले विचार त्यांच्या वर्तनाचा मूळ पाया जर असेल. तर गावाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही. प्रगती आणि विकासाचे रहस्य हे विचारात दडलेले आहे. म्हणून राष्ट्रसंत सांगतात मानवाने त्याचे 'वर्तन' हे उत्तम प्रकारे जतन केले पाहिजे. वर्तन हा विचाराचा सांस्कृतिक ठेवा आहे. हीच विचाराची शिदोरी आपल्याला येणाऱ्या कित्येक पिढ्यांपर्यंत पोचवायची आहे. आपले गाव या विश्वाचे आदर्श चित्र बनवायचे असेल तर याच मानवी वर्तनातून आपल्याला सर्वांगपूर्ण ग्राम सुंदर बनवावे लागेल. ग्रामाचा विकास हा त्या गावातील लोकांच्या मानसिकतेवर अर्थातच त्यांच्या विचारप्रवृत्तीवर अवलंबून असतो. म्हणूनच राष्ट्रसंतांच्या मते गाव, देश आणि विश्वाचा विकास साध्य करण्यासाठी प्रथम पाया असणारे मानवी वर्तन आणि विचार महत्त्वाचे असून या विश्वाच्या कल्याणाचा मूळ पाया असणारे मानव- वर्तन जतन करण्याचे ते आव्हान करतात.

**प्रा. रामदास धोंडगे,**
बुलढाणा

# तिचं माहेरपण...

वसुधाला शाळेत जायची घाई होती.. गावातल्याच जि.प.च्या शाळेत ती प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करत होती.घरात ती ,तिचा पती महेश व एक पाच वर्षांचा मुलगा आयुष अशी तीनच माणसं.. तिच्या सासूबाई तिच्या जावेचे बाळ छोटं असल्याने तिच्या कडे गेल्या होत्या.एकेक कामं ती पटापटा आवरत होती. एवढ्यात दाराची बेल वाजली.. तीने घाईने दरवाजा उघडला; तो समोर तिला रखमाबाई दिसल्या. त्यांना पाहून ती म्हणाली,"काय काकू आज एवढ्या लवकर?"रखमाबाई म्हणाल्या,"हो ताई आज मला जरा घाई हाय म्हणून सगळे काम बिगिन उरकावं म्हणलं." यावर वसुधा म्हणाली,"कशाची हो एवढी घाई? रखमाबाई म्हणाल्या," ताई मी आता दोन-तीन दिवस कामाला येणार नाही., वसुधा म्हणाली,"का कुठे जाणार आहात? की तब्येत ठीक नाही तुमची!"नाही ताई तब्येत चांगली हाय माजी. पण पोरीने लय नाद लावलाय चार दिवस तिच्याकडे जाऊन येते. वसुधाला मात्र समोर संकट उभा राहिल्या सारखं वाटलं. गेल्या चार-पाच वर्षापासून रखमाबाई तिच्याकडे कामाला येत होत्या. कपडे भांडे व साफसफाई सगळं काही त्याच करायचा. त्यामुळे त्यांचा तिला मोठाच आधार वाटायचा. रखमाबाईंना एक मुलगी व एकच मुलगा दोघांचेही लग्न झाले. मुलगी सासरी सुखात. मुलगाही आपल्या बायकोला घेऊन दुसरीकडे राहतो. त्याच्या बायकोचे व रखमाबाईंचे पटत नाही. त्यामुळे त्या एकट्याच राहायच्या. स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अनेक घरची कामं करायच्या. एका अपघातात मुलं लहान असतानाच त्यांच्या पतीचे निधन झालेले असल्याने खूप कष्टाने त्यांनी मुलांचा सांभाळ केला. वसुधाला एका क्षणात सारं काही डोळ्यांसमोर आलं.. विचाराच्या तंद्रीतच ती भानावर आली. रखमाबाईनी आपले काम करायला सुरुवात केली. कपडे भिजवून ठेवले व भांडी घासायला घेतली.भांडे घासतच त्या बोलू लागल्या,"काय माहित ताई नेमकं पोरीच्या काय मनात हाय त्या दिवशी फोन आला होता तिचा.लईच नाद लावलाय बघा ये म्हणून...मला तर भ्या वाटायलयं जावयाचं अन् तिचं काही बिनसलं तर नसेल...?" वसुधा म्हणाली,"नाही हो काकू असा काही वाईट विचार मनात आणू नका. चांगलं चाललंय तुमच्या राधाचं... सहजच तुमच्या भेटीसाठी बोलावलं असेल तिनं." रखमाबाईं त्यांची काम करून निघून गेल्या. वसुधाही शाळेला गेली. रखमाबाई गेल्यावर तशी तिची दोन-चार दिवस बरीच धावपळ झाली. मुलाचा डब्बा ,नवऱ्याचा डब्बा ... घरातील सगळी काम करता -करता तिची पुरे दम छाक झाली. तिच्या सासुबाईं तिच्याकडे होत्या तोपर्यंत त्यांचा खूप आधार वाटायचा. आता त्या जावेकडे गेल्यामुळे घरात कोणाचाच आधार नव्हता. तीन-चार दिवसाच्या सुट्टीनंतर रखमाबाईं सकाळी पुन्हा कामावर हजर झाल्या. आल्या तशा त्यांच्या कामाला लागल्या. वसुधाने विचारलं,"काय झालं काकू कशाला बोलावलं होतं राधाने तुम्हाला? यावर रखमाबाई म्हणाल्या,"काय सांगू ताई मला वाटलं तसं काय बी नव्हतं. तिचा संसार लई सुखाचा झालाय. तिनं मला माहेरपणासाठी बोलावलं होतं," हे शब्द ऐकून वसुधाला आश्चर्यच वाटलं. रखमाई सांगत होत्या,"मी तिच्या दारात जातात तिने भाकरीचा तुकडा माझ्यावरून ओवाळून टाकला. पाय धुवायला पाणी दिलं . चार दिवसात वेगवेगळे पदार्थ करून खाऊ घातले. मायेने न्हाऊ- माखू घातलं. एखाद्या पोरीचे माहेरी व्हावे तसेच सारे लाड तिने माझे केले. जीवाला लई बरं वाटलं. अन् पोरीचं कौतुक बी वाटलं, जावयानं बी मला आईसारखी माया लावली. तिच्या सासूबाई बी माज्या राधीचं लय कौतुक करू लागल्या. दोन सोन्यासारखे नातवंड आजी -आजी म्हणून जवळ येऊ लागले. जावयाने भारीची साडी घेतली.माझ्या जन्माचे सार्थक झाल्यासारखं वाटलं." सखमाबाईच्या लेकीने त्यांचे केलेले माहेरपण ऐकून वसुधाचे डोळे भरून आले. तिलाही तिच्या आईची खूप आठवण आली. भाऊ नोकरीसाठी पुण्याला होता. रखमाबाईंची आणि तिच्या आईची कथा थोडीशी सारखीच होती. तिच्या बाबांचेही असेच ती लहान असतानाच अल्पशा आजाराने निधन झालेले होते. आईने शाळेत सेविकेची नोकरी केली होती.मोठ्या धीराने दोन्ही मुलांना शिकवले व त्यांची लग्न करून दिली होती.त्यामुळे वसुधाला रखमाबाईंमध्ये आईच दिसायची. रखमाबाई त्यांचे काम करून निघून गेल्या. वसुधाचे चित्त मात्र आज थाऱ्यावर नव्हते. तिच्याही मनात सारखा आईच्या माहेरपणाचाच विचार येत होता. तिलाही वाटत होते आईला चार दिवस आपल्या घरी आणावं. आपण माहेरी गेल्यावर आई आपल्यासाठी जे जे करते ते ते सारं काही तिच्यासाठी करावं. तिला कितीं -कितीं आनंद होईल. आईच्या माहेरपणाच्या विचारातच ती आज घरी आली. घरी आल्यावर आपल्या मनातला विचार तिने आपल्या पतीला महेशला बोलून दाखवला... त्यालाही तिची ही कल्पना खूप आवडली. आपल्या सासूच्या कष्टांची त्याला चांगलीच जाणीव होती. तो वसुधाला म्हणाला,"वसु खूप छान कल्पना आहे तुझी.. आपण आईंना थोडा जरी आनंद देऊ शकलो तर मलाही खूप छान वाटेल.आता सात -आठ दिवसात दिवाळीच्या सुट्ट्या येत आहेत. दरवर्षी तू आईकडे दिवाळीला जातेस यावर्षी त्यांनाच आपल्या घरी बोलवू. यावर्षीची दिवाळी आपण त्यांच्यासोबत आपल्या घरीच साजरी करु.काय कशी काय वाटली माझी कल्पना?"यावर वसुधा काय म्हणणार ती आनंदाने भारावून गेली.कधी एकदा दिवाळीच्या सुट्ट्या लागतात व कधी आई आपल्या घरी येते असे तिला झाले.

सात -आठ दिवस निघून गेले. सुट्ट्यांमध्ये आठ दिवस आईसाठी काय- काय करायचे याचे नियोजन वसुधा करू लागली.आईला तिने काहीच कल्पना दिली नव्हती. तिने आईला फोन करून ,"उद्या तुला घेण्यासाठी तुझे जावाई येणार आहेत असं सांगितलं. आईला म्हणाली," आई आम्ही या सुट्ट्यांमध्ये देवदर्शनासाठी जाणार आहोत.तुला सोबत घेऊन जायचे आहे त्यामुळे तू त्यांच्यासोबत उद्या ये. लेकीचे हे शब्द ऐकून मंदाबाईंना अवघडल्यासारखं वाटलं. हो नाही म्हणत त्या जावयासोबत यायला तयार झाल्या.

महेश तिच्या आईला आणण्यासाठी तिच्या माहेरी गेला .जावयाला अंगणात पाहून वसुधाच्या आई स्वागतासाठी पुढे आल्या. हात -पाय धुवायला पाणी दिले.चहा- पाणी झाल्यावर थोड्या विश्रांतीनंतर जेवायला वाढले. जावयाच्या आवडीचे चिंचगुळाचे वरण ,अळुच्या वड्या, मुगाचा शिरा, भात ,भजे ,पापड कोशिंबीर असे सारे पदार्थ त्यांनी केले होते. महेशचे जेवण झाल्यावर. मंदाबाईंनी जेवण केले सगळी आवरा आवर केली व थोडा वेळ आराम करून दोघेही निघाले. इकडे आई येणार म्हणून वसुधा आतूर झाली होती.दोन- चार दिवसांवर दिवाळी आली होती. तिने आई येण्याआधीच बरेचसे फराळाचे पदार्थ करून ठेवले होते. स्वयंपाकाची सर्व तयारी झाली होती.एवढ्यात दारात गाडी आल्याचा आवाज आला. वसुधा लगबगीने बाहेर आली. तिने सकाळीच दारात छानशी रांगोळी काढली होती.हातात औक्षणाचे ताट होते. तिने आधी आईवरुन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला व नंतर पाय धुऊन औक्षण केले. हे सर्व करत असतानाचा व्हिडिओ आयुष बनवतच होता. हे सर्व पाहून मंदाबाईंचे मन भरून आले. वसुधा लगेच आईच्या कुशीत शिरली. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू वाहू लागले. थोडा वेळ चहा- पाणी इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर वसुधाने गरम गरम पोळ्या टाकल्या व जेवायला वाढून घेतले. वसुधाच्या आईने तिच्यासाठी आणलेले एक -एक पदार्थ पिशवीतून बाहेर काढले. आंबा, लिंबू ,मिरची असे वेगवेगळे लोणचे ,पापड, कुरडया, शेवया ,काळा मसाला असं बरंच काही त्यांनी आणलं होतं. सारे सामान त्यांनी वेगवेगळ्या डब्यांमध्ये, बरण्यामध्ये भरुन ठेवलं. सगळ्यांची जेवण झाली. आजी आल्याने आयुष खूप आनंदी झाला होता. सारखा आजीच्या अवतीभोवती फिरायचा ,मांडीवर बसायचा आजी कडून कोड कौतुक करून घ्यायचा, हे पाहून वसुधाला खूप आनंद वाटायचा.

दुसऱ्या दिवशी पहाटेच तुळजापूर, पंढरपूर व इतर ठिकाणी फिरायला जाण्याचा बेत ठरला. वसुधाने सगळी तयारी आधीपासूनच करून ठेवलेली होती आईच सामान तेवढे घेणे बाकी होतं. दोन दिवस बाहेर फिरून नंतर घरीच दिवाळी साजरी करायची असा विचार वसुधा व महेशचा होता. त्याप्रमाणे ते दोन दिवसात खूप छान सगळीकडे फिरून आले. दोन दिवसांची ही यात्रा संस्मरणीय झाली होती. आईंनाही एकटे एकटे राहून खूप कंटाळावानं वाटत होतं या दोन दिवसात तिला जणू भरभरून जगायला मिळालं. याचं मनस्वी समाधान वसुधाला वाटत होतं.

आता दिवाळी सुरू झाली होती. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन ,बलिप्रतिपदा , पाडवा व भाऊबीज दिवाळीचे सर्वच दिवस खूप आनंदात गेले. वसुधाने आईला आवडणारे एकेक पदार्थ दररोज तिला करून खाऊ घातले. मंदाबाईंना लेकीची माया पाहून डोळे भरून यायचे. क्षणोक्षणी तिच्या बाबांची आठवण यायची. पण लेकीचा सुखाचा संसार पाहून त्या समाधान मानत. असेच पाहता पाहता आठ दिवस निघून गेले.दिवाळीचे दिवस संपून गेले.वसुधाने आईचे माहेरपण करण्यात कोणतीही उणीव ठेवली नाही.लेकीच्या घरचे हे माहेरपण पाहून मंदाबाईना त्यांच्या आईची आठवण झाली.त्या वसुधाला म्हणाल्या, "वसु खूप छान वाटलं गं तुझ्या घरचं हे माहेरपण. मला तर वाटतं प्रत्येक मुलींनी असं आईचं माहेरपण केलं पाहिजे. तेवढेच चार दिवस आनंदात जगता येतं."यावर वसुधा आईला म्हणाली,"हो आई अगदी खरं आहे तुझं. प्रत्येक आई आपल्या मुलींसाठी किती करत असते. पण उतारवयात तिलाही मायेची गरज असतेच की गं . मी यापुढे नेहमीच तुला असं माहेरपणाला माझ्याकडे घेऊन येईन. खूप छान वाटलं.. आईची आई होण्याचं वेगळेच समाधान मिळालं मला. आता आईची गावी जायची वेळ झाली होती. वसुधाने त्यांची बॅग भरून दिली व त्यांच्यासाठी आणलेली छानशी साडी त्यांना नेसायला दिली. आईच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून वसुधाला खूप छान वाटलं. महेशने आईची बॅग गाडीमध्ये ठेवली.. आयुषला एकदा जवळ घेऊन मंदाबाईंनी त्याचा पापा घेतला. वसुधाच्या पाठीवरून, डोक्यावरून मायेने हात फिरवून तिला कुशीत घेतलं. त्यांचे डोळे भरून आले होते वसुधाच्याही डोळ्यात नकळत पाणी आलं... मंदाबाई गाडीत बसल्या...नजर जाईल तोपर्यंत हात हलवून टाटा करत होत्या. पदराने डोळे पुसत होत्या... लेकीच्या माहेरपणाच्या सुंदर आठवणी सोबत घेऊन त्या पुन्हा नव्या उमेदीने जगण्यासाठी निघाल्या होत्या...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
परभणी

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

# आम्ही गडकरी-फडणवीसांना निवडून दिलं...

## मग महापौर निवडण्याची संधी आम्हाला का नाही? नाराज भाजप कार्यकर्त्यांचा सवाल

दिव्य वतन /प्रतिनिधी

नागपूर : महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये अंतर्गत नाराजी उफाळून येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रभाग क्रमांक १७ मध्ये बाहेरच्या पक्षातून आलेल्या उमेदवाराला भाजपकडून तिकीट देण्यात आल्याने स्थानिक व जुने कार्यकर्ते संतप्त झाले असून त्यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त केली आहे. या नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढण्यासाठी आमदार संदीप जोशी यांनी बैठक घेतली.

या बैठकीदरम्यान संदीप जोशी यांनी कार्यकर्त्यांच्या भावना ऐकून घेतल्या. ते म्हणाले की, या प्रभागात मागील निवडणुकीत तीन जागा निवडून आणणारे हेच कार्यकर्ते आहेत. स्वच्छ आणि निष्ठावान काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवडून दिले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची नाराजी स्वाभाविक आहे. मी सर्वांची मते ऐकून घेतली असून हा विषय लवकरच पार्लमेंटरी बोर्डच्या बैठकीत मांडणार आहे. बाहेरून आलेल्या उमेदवाराला तिकीट दिल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये रोष आहे. अनेक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, वर्षानुवर्षे पक्षासाठी झटणाऱ्यांना डावलून नव्या व बाहेरच्या लोकांना संधी दिली जात आहे. यावर बोलताना संदीप जोशी म्हणाले की, आज भारतीय जनता पार्टी खूप मोठी झाली आहे. नागपूर महानगरपालिकेत १५१ नगरसेवकांची जागा आहे, तर जवळपास ५००० इच्छुक उमेदवार तिकीट मागत आहेत. त्यामुळे सर्वांनाच समाधान मिळणे शक्य नाही. याच कारणामुळे नाराजी निर्माण झाली आहे. ते पुढे म्हणाले की, ज्यांना बाहेरून उमेदवारी मिळाली आहे ते देखील आता भाजपचेच कार्यकर्ते आहेत. मात्र स्थानिक कार्यकर्त्यांना वाईट वाटणे स्वाभाविक आहे. स्थानिक उमेदवारालाच तिकीट मिळावे, अशी त्यांची भावना आहे.

या बैठकीत एका महिला कार्यकर्त्यांनी आपली खदखद व्यक्त केली. "मी गेल्या ३० वर्षांपासून भाजपसाठी काम करत आहे. मी सक्षम कार्यकर्ता असून यापूर्वीही उमेदवारीचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र तिकीट मिळाले नाही. यावेळीही उमेदवारीचे आश्वासन देऊन डावलण्यात आले. आम्हाला तिकीट न देता कधीही पक्षाच्या कामात न दिसणाऱ्या नव्या लोकांना उमेदवारी दिली जाते, हे दुर्दैवी आहे," असे त्या म्हणाल्या.

कार्यकर्त्यांनी असा सवालही उपस्थित केला की, "आम्ही नितीन गडकरी यांना निवडून दिले ते केंद्रात मंत्री झाले आणि देवेंद्र फडणवीस यांना निवडून दिले. ते मुख्यमंत्री झाले, तर नागपूरचा महापौर निवडून देण्याची जबाबदारी आमच्यावर नाही का?" काँग्रेसमधून आलेल्या उमेदवाराला भाजपने तिकीट दिल्यामुळेच कार्यकर्त्यांचा विरोध अधिक तीव्र झाल्याचे या बैठकीत कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.



## महत्त्वाचे...



### भारतानं निभावली मैत्री, आता पाकिस्तानचं ब्लॅकमेलिंग थांबणार...

वृत्तसंस्था : भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील मैत्री दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे. पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आणि औषधांच्या पुरवठ्यावरून होणाऱ्या ब्लॅकमेलिंगमुळे अफगाणिस्तानला मोठा धक्का बसला होता.अशा परिस्थितीत भारताने अफगाणिस्तानला मदतीचा हात पुढे केला आहे. भारताने अफगाणिस्तानला अत्याधुनिक रुग्णवाहिकांची एक खेप दिली आहे. तालिबान सरकारला भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी हे आश्वासन दिले होते. जयशंकर यांनी सांगितले होते की, भारताकडून 20 रुग्णवाहिकांची ही खेप एक सद्भावना भेट आहे. इतकेच नाही, तर जयशंकर यांनी हे देखील स्पष्ट केले होते की, भारत अफगाणिस्तानमधील रुग्णालयांसाठी MRI आणि CT Scan मशीन पुरवेल. यासोबतच लहान मुलांसाठीची लस आणि कर्करोगावरील औषधे देखील दिली जातील.रिपोर्टनुसार रुग्णवाहिका पुरवणे हा भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील आरोग्य सेवा सहकार्याचा एक भाग आहे. भारत काबुलमधील इंदिरा गांधी यांच्या नावाने असलेल्या बाल रुग्णालयातील heating system बदलेल. तसेच, तेथील उपचार पद्धती आधुनिक करेल.

### चीनने मॅग्लेव्ह ट्रेनच्या वेगाचा नवा विक्रम रचला, 700 किमी/तास गती गाठली



बीजिंग: चीनने मॅग्लेव्ह ट्रेनच्या वेगाचा नवा विक्रम रचला आहे. अवघ्या दोन सेकंदात त्यांनी एका टन वजनाच्या गाडीला तब्बल ७०० किमी/तास (435 mph) वेगापर्यंत पोहोचवले. इतकेच नाही, तर ती गाडी सुरक्षितपणे थांबवण्यातही यश मिळवले. नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ डिफेन्स टेक्नॉलॉजीच्या संशोधकांनी हा पराक्रम केला आहे. या चाचणीमुळे एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित झाला आहे. ही आतापर्यंतची जगातील सर्वात वेगवान सुपरकंडक्टिंग इलेक्ट्रिक मॅग्लेव्ह ठरली आहे. चीनच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक एक्सेलेरेशन टेक्नॉलॉजीमध्ये ही एक मोठी झेप मानली जात आहे.

'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट'च्या रिपोर्टनुसार, इलेक्ट्रोमॅग्नेटिक एक्सेलेरेशन टेक्नॉलॉजीची ही चाचणी हायपरलूप प्रवासाला नवे स्वरूप देऊ शकते. हायपरलूप म्हणजे व्हॅक्यूम-सील्ड ट्यूब, ज्या भविष्यातील प्रवासासाठी विकसित केल्या जात आहेत. या चाचणीमुळे प्रचंड वेग गाठण्याची क्षमता आणि उच्च क्षमतेचे नियंत्रण दोन्ही शक्य होणार आहे. सध्या मॅग्लेव्ह ट्रेनच्या क्षेत्रात चीन आणि जपान हे दोन देश आघाडीवर आहेत.

तब्बल तीस वर्षांपूर्वी, याच विद्यापीठाने चीनची पहिली मानवयुक्त-चलित सिंगल-बोगी मॅग्लेव्ह ट्रेन विकसित केली होती.

# वेग इतका की ट्रेन दिसतही नाही



जकार्ता: इंडोनेशियाच्या सुलावेसी बेटावरील मनाडो शहरात एका वृद्धाश्रमात आग लागून 16 लोकांचा मृत्यू झाला. आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. एएफपीनुसार, उत्तरी सुलावेसी प्रांताची राजधानी असलेल्या मनाडो शहरात वेरधा दमाई नावाच्या वृद्धाश्रमात रविवारी रात्री 8 वाजून 31 मिनिटांनी आग लागल्याची माहिती मिळाली. जेव्हा अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले, तेव्हा आग संपूर्ण इमारतीत पसरली होती.

स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, आग वेगाने इमारतीत पसरली. स्थानिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या व्हिडिओंमध्ये लोक आगीच्या भयंकर परिस्थितीत अडकलेल्या वृद्धांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करताना दिसत होते. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, पोलीस अधिकारी हसीबुआन यांनी सांगितले की, आग विझवण्यात रात्री उशिरा यश आले. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही आणि या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मनाडो फायर डिपार्टमेंटचे प्रमुख जिमी रोटिनसुलु यांनी सांगितले की, तीन वृद्ध भाजले होते, तर 12 लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, त्यांना कोणतीही दुखापत झाली नव्हती.एएफपीच्या रिपोर्टनुसार, आग लागली तेव्हा वृद्ध रात्रीचे जेवण करून आपापल्या रूममध्ये आराम करत होते. अनेक मृतांचे मृतदेह त्यांच्या खोल्यांमध्येच सापडले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. प्रशासनाने तपासानंतर अधिक माहिती देण्याचे आश्वासन दिले आहे. तपास पथक घटनास्थळी पोहोचले असून आगीच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. हॉस्पिटलमध्ये पीडितांच्या मृतदेहांची ओळख पटवली जात आहे.जनसंपर्क अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मनाडो शहर प्रशासनाने पाठवलेल्या तीन अग्निशमन गाड्या घटनास्थळी पोहोचल्यानंतर रात्री सुमारे 9 वाजून 30 मिनिटांनी आग विझवण्यात आली. आगीची बातमी मिळताच पोलीस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अधिकारी आणि जवानांनी परिसर सुरक्षित केला आणि बचाव कार्यात मदत करण्यास सुरुवात केली. जिवंत वाचलेल्या लोकांना मानाडो सिटी रीजनल हॉस्पिटल आणि परमाता बुंडा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पोलीस फॉरेन्सिक टीम घटनाक्रम आणि आग लागण्याचे प्राथमिक कारण शोधण्यासाठी घटनास्थळाची तपासणी करत आहेत.यासोबतच, घटनेच्या प्रत्यक्षदर्शींचीही चौकशी केली जात आहे जेणेकरून आग लागण्याचे कारण समजू शकेल.

### अयोध्या-काशीमध्ये 2 किमी लांब रांग, वृंदावनमध्ये महाकुंभासारखी गर्दी



अयोध्या - नवीन वर्षापूर्वी काशी, मथुरा आणि अयोध्येत भक्तांची प्रचंड गर्दी उसळली आहे. अयोध्येतील रामलल्ला आणि काशीतील बाबा विश्वनाथांच्या दर्शनासाठी 2–2 किलोमीटर लांब रांगा लागल्या आहेत.

वृंदावनमध्ये तर महाकुंभासारखी गर्दी जमली आहे. येथे पाय ठेवायलाही जागा नाही. वाढती गर्दी लक्षात घेता, बांके बिहारी मंदिर व्यवस्थापनाने 29 डिसेंबर ते 5 जानेवारीपर्यंत भाविकांना वृंदावनला न येण्याचे आवाहन केले आहे.

सोमवारी कुठे किती भाविक पोहोचले.

अयोध्येत दीड लाख भाविक राम मंदिर आणि हनुमानगढीच्या आसपास उपस्थित आहेत.

काशीमध्ये बाबांच्या दर्शनासाठी 3 लाख लोक पोहोचले.

वृंदावनमध्ये 2 लाख भाविक आहेत. गिरिराज, नंदगाव, बरसाना आणि मथुरेतही बरीच गर्दी आहे.

# राजेंद्र जंजाळ शिवसेना कार्यालातून रडत बाहेर पडले, आता शिरसाटांच्या भेटीला

## छ. संभाजीनगरमध्ये मोठ्या घडामोडी

दिव्य वतन /वृत्तसंस्था



छत्रपती संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत फूट पडण्याची चिन्हे असताना भाजपला गेलेल्या जागा शिंदेसेनेकडे याव्यात यासाठी जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी कार्यकर्त्यांसह थेट पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या घरी पोहोचले. जागावाटपावरुन नाराज असलेले कार्यकर्त्यांसह राजेंद्र जंजाळ शिरसाट यांच्या घरी त्यांच्या भेटीला गेले. त्यापूर्वी जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ हे शिवसेनेच्या कार्यालयातून रडत रडत बाहेर पडले होते.

ते प्रभाग सोडणं पक्षाला परवडणारं नाही - राजेंद्र जंजाळ

आम्ही पालकमंत्री साहेबांना मुख्य समन्वय समितीचे प्रमुख म्हणून सांगायला आलो आहे की, शिवाजीनगर वार्ड ज्याने शिरसाट साहेबांवर भरभरुन प्रेम केलं. त्यांना सर्वात जास्त मतदान त्या वार्डातून झालं आहे. असं असतानाही शिवाजीनगर प्रभागात फक्त एक जागा त्यांनी आपल्याला सोडण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यानंतर २१ नंबरचा प्रभाग, त्या प्रभागात कोणत्याही निवडणुकीच्या निकालात शिरसाट साहेबांना आणि भुमरे साहेबांना भरघोस मतदान झालं आहे. एवढी आपली बाजू तिथे भक्कम असताना ते प्रभाग सोडून देणं पक्षाच्या दृष्टीने परवडणारं नाही. प्रभाग क्रमांक २२ मध्ये दोन दिले, दोन आपल्याला दिले, ते ठीक आहे, पण या दोन प्रभागांमध्ये आपले मतदार आहेत. ते सगळे मतदार बांधव इथे आले आहेत जे शिरसाट यांना प्रश्न विचारत आहेत की आम्ही तुम्हाला मतदान केलं मग आमचं चुकलं का? त्यामुळे हा प्रस्ताव मान्य करण्यात येऊ नये, प्रभाग क्रमांक २१ मध्ये किमान एक जागा सोडावी, प्रभाग क्रमांक २७ मध्ये किमान दोन-तीन जागा सोडण्यात याव्या. ज्याप्रकारे त्यांनी सातारा-देवळे येथील चारही प्रभाग घेतले त्याच पद्धतीने तेवढंच प्रेम त्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये करावं, अशी विनंती करण्यासाठी मी आणि वॉर्डातील सर्व मतदार आले आहेत, असं राजेंद्र जंजाळ म्हणाले.तसेच, कदाचित शिरसाट साहेबांनी या बुथवर झालेलं मतदान पाहिलं असेल, तरी त्यांनी हा प्रस्ताव मान्य करु नये, हिच आमची विनंती होती, असंही त्यांनी सांगितलं.

# राज ठाकरेंचा शिंदेंना ठाण्यात पहिला धक्का, तर अविनाश जाधव यांच्या निकटवर्तीयाचा तडकाफडकी राजीनामा

दिव्य वतन /वृत्तसंस्था



विनित जांगळे, ठाणे : ठाणे महापालिका निवडणुकांचे अर्ज दाखल करण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना ठाण्यातील पक्षांतर्गत इन्कमिंग आणि आऊटगोईंगला सुरुवात झाली आहे. उमेदवारीच्या अपेक्षेने शिवसेनेतील पदाधिकाऱ्याने मनसेचा झेंडा हाती घेतला आहे. तर उमेदवारी नाकारल्याने मनसेच्या पदाधिकाऱ्याने पक्षाला अखेरचा 'जय महाराष्ट्र' केला आहे. ठाण्यातील खारटन रोड परिसरात शिवसेनेचे उपविभागप्रमुख असलेले आणि शिवसेना मागासवर्गीय सेलचे शहरप्रमुख असणाऱ्या गणेश कांबळे यांनी सोमवारी पदाधिकाऱ्यांसह मनसेत जाहीर प्रवेश केला. कांबळे हे पालिका निवडणुकीत शिवसेनेच्या वतीने उमेदवारीसाठी इच्छुक होते. मात्र त्यांना संधी देण्यात न आल्याने त्यांनी मनसेचा पर्याय स्वीकारला. गणेश कांबळे यांच्या पक्षप्रवेशावेळी मनसे नेते अभिजित पानसे, ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव उपस्थित होते.दरम्यान, मनसेचे पाचपाखाडी येथील प्रभाग क्रमांक १२ चे उपविभाग अध्यक्ष प्रितेश मोरे यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. अविनाश जाधव यांचे निकटवर्तीय अशी ओळख असलेल्या मोरे यांनी वैयक्तिक कारणास्तव मनसेच्या प्राथमिक सदस्यत्व आणि इतर पदांचा राजीनामा दिल्याचे पत्रात नमूद केले आहे. मात्र पालिका निवडणुकीत उमेदवारी नाकारल्याने मोरे यांनी ही भूमिका घेतल्याची चर्चा मनसेमध्ये रंगली आहे. याबाबत मोरे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकलेला नाही. उमेदवारीची शाश्वती नसल्याने पक्षांतर कांबळे यांनी प्रभाग क्रमांक २२ येथून उमेदवारीसाठी चाचपणी केली होती. या ठिकाणी भाजपचे सुनील हंडोरे, नम्रता कोळी आणि शिवसेनेचे सुधीर कोकाटे आणि पल्लवी कदम विद्यमान नगरसेवक आहेत. ठाण्यामध्ये महायुतीची चर्चा अंतिम टप्प्यात असून विद्यमान नगरसेवकांचा येथील जागांवर दावा कायम आहे. त्यामुळेच अखेर उमेदवारीची शाश्वती नसल्याने कांबळे यांनी मनसेच्या इंजिनाला पसंती दिली आहे.

# ममता म्हणाल्या- माझ्यावर तुष्टीकरणाचे आरोप, पण मी धर्मनिरपेक्ष:लोक गुरुद्वारात गेल्यावर शांत राहतात

दिव्य वतन /वृत्तसंस्था



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी त्यांच्यावरील तुष्टीकरणाच्या आरोपांना उत्तर दिले. ममता यांनी कोलकाता येथे सांगितले की, अनेक लोक म्हणतात की, मी तुष्टीकरण करत आहे, पण मी धर्मनिरपेक्ष आहे आणि सर्व धर्मांवर विश्वास ठेवते. मला बंगालवर प्रेम आहे, मला भारतावर प्रेम आहे. हीच आमची विचारधारा आहे.

तृणमूल काँग्रेस प्रमुखांनी आरोप करणाऱ्याचे नाव सांगितले नाही, परंतु विरोधी भाजप त्यांच्यावर मुस्लिमांना खूश करण्याचा आरोप नेहमीच करत आली आहे. यावर ममता म्हणाल्या की, जेव्हा मी गुरुद्वारात जाते तेव्हा तुम्ही काहीच बोलत नाही, पण जेव्हा मी ईदच्या कार्यक्रमात जाते तेव्हा माझी टीका करू लागता. हे योग्य नाही.

खरं तर, ममता कोलकाता येथील न्यू टाऊनमध्ये देवी दुर्गाला समर्पित असलेल्या 'दुर्गा आंगण' या सांस्कृतिक संकुलाच्या भूमिपूजन समारंभात बोलत होत्या.

प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा लोकशाही अधिकार: ममता पुढे म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा लोकशाही अधिकार आहे. मी केंद्र सरकारकडून गंगासागरमध्ये पूल बांधण्याचा प्रयत्न करत होते, पण आता मी तो स्वतः बांधेन. मी 5 जानेवारीला भूमिपूजन करेन आणि पुढील दोन वर्षांत पूल जनतेसाठी तयार होईल. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात आम्ही सिलीगुडीमध्ये महाकाल मंदिराचे भूमिपूजन करणार आहोत.

SIR फक्त लोकांना त्रास देण्यासाठी: ममता बॅनर्जींनी आपल्या भाषणात राज्यात सुरू असलेल्या SIR प्रक्रियेबद्दलही चिंता व्यक्त केली. त्यांनी लोकांना त्रास देण्याचा आणि जीवित व वित्तहानीचा आरोप केला. ममता म्हणाल्या की, लोकांना विनाकारण त्रास दिला जात आहे. SIR प्रक्रियेदरम्यान एका महिन्यात 50 हून अधिक लोकांचा जीव गेला. आम्ही लोकांच्या लोकशाही हक्कांचे रक्षण करण्यासाठी लढत राहू आणि यासाठी आपला जीव देण्यासही तयार आहोत.27 डिसेंबर 2025: सुवेंदु म्हणाले- बांगलादेशला गाझासारखा धडा शिकवला पाहिजे.बांगलादेशात दोन हिंदूंच्या हत्येवरून पश्चिम बंगालमध्येही निदर्शने सुरू आहेत. दोन दिवसांपूर्वी भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचा एक व्हिडिओ समोर आला. यात त्यांनी 100 कोटी हिंदूंचा हवाला देत म्हटले की, बांगलादेशला गाझासारखा धडा शिकवला पाहिजे. त्यांनी असेही म्हटले की, भारताने जसे ऑपरेशन सिंदूर करून पाकिस्तानला धडा शिकवला होता.यावरून बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस (TMC) पक्षाने त्यांच्यावर टीका करत म्हटले की, भाजपने द्वेष आणि कट्टरता आपली ओळख बनवली आहे.

# शहा म्हणाले- आसामसारखे पूर्ण देशातून घुसखोरांना हाकलून लावू...

दिव्य वतन /वृत्तसंस्था



आसाममधील नौगाव येथे सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बटाद्रवा स्थान पुनर्विकास प्रकल्पाचे उद्घाटन करण्यासाठी पोहोचले. कार्यक्रमात शहा म्हणाले - हिमंता बिस्वा सरमा यांनी बांगलादेशी घुसखोरांकडून एक लाख बिघा जमीन मुक्त केली आहे. याचप्रमाणे आम्ही संपूर्ण देशातून घुसखोरांना हाकलून देऊ.

त्यांनी पुढे म्हटले की, आज मला गोपीनाथ बोरदोलोई यांची आठवण करायची आहे. जर ते नसते, तर आज आसाम आणि संपूर्ण ईशान्य भारत भारताचा भाग नसता.

शहा म्हणाले की, गोपीनाथ यांनीच जवाहरलाल नेहरू यांना आसाम भारतात ठेवण्यासाठी भाग पाडले होते.

केंद्र सरकारने उग्रवादी संघटनांसोबत शांतता करार केले आहेत, त्यापैकी 92% अटी पूर्ण झाल्या आहेत. आसाममध्ये शांतता आणि विकासाची स्थिती मजबूत झाली आहे.बटाद्रवा थान हे नव-वैष्णव धर्माचे केंद्र आहे. हे ठिकाण आसामच्या सांस्कृतिक एकतेचे आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक आहे.

# पक्षाकडून उमेदवारीची शक्यता मावळली; इच्छुक महिला उमेदवाराला रडू कोसळलं

दिव्य वतन /प्रतिनिधी



जळगाव : राज्यभरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता केवळ उद्यापर्यंत (30 डिसेंबर) वेळ आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षात प्रचंड हालचाली सुरु आहेत. प्रत्येक पक्षाकडून आपापल्या उमेदवारांना एबी फॉर्म दिला जात आहे. पण या प्रक्रियेत अनेक पक्षांचे कार्यकर्ते हे नाराज होताना दिसत आहेत. महापालिका निवडणुकीसाठी प्रत्येक पक्षात आणि प्रत्येक वॉर्डात अनेक इच्छुक उमेदवार आहेत. त्यामुळे ज्या इच्छुकांना उमेदवारी मिळाली त्यांचा हिरमोड होत आहे. जळगावातही तेच चित्र दिसलं आहे. उमेदवारी न मिळाल्यामुळे एक इच्छुक महिला उमेदवाराला अक्षरशः रडू कोसळलं. या महिलेचा व्हिडीओ सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे.जळगाव महापालिका निवडणुकीत प्रभांग क्रमांक 10 मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कलाबाई शिरसाठ या इच्छुक आहेत. इथे शिवसेना ठाकरे गट आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची युती झाली आहे. त्यामुळे हा प्रभाग ठाकरे गटाला सुटला आहे. इथे चारही उमेदवार हे ठाकरे गटाचे निश्चित झाले आहेत. पण या वॉर्डमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या कलाबाई शिरसाट या इच्छुक आहेत. आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी त्यांनी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील यांच्याशी संपर्क करण्याचा देखील प्रयत्न केला. पण त्यांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्या नाराज झाल्या.

# मैत्री असावी तर अशी! भाईजानने रितेश देशमुखसाठी बनवली स्पेशल 'भाऊंची भेळ'

बॉलिवूडचा भाईजान सुपरस्टार Salman Khan चा 60 वा वाढदिवस 27 December 2025 रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने त्याच्या पनवेल फार्महाऊसवर भव्य पार्टी आयोजित करण्यात आली होती. अनेक सेलिब्रिटी या पार्टीत उपस्थित होते. सलमानने पापाराझींसोबतही मोठा केक कापून वाढदिवस साजरा केला होता. या सेलिब्रेशनदरम्यान विविध फोटो-व्हिडिओ समोर आलेले. आता अभिनेत्याचे काही खास क्षण रितेश आणि जिनिलिया देशमुख यांनी सोशल मीडियावर शेअर केले असून सलमानचा एक वेगळाच अंदाज यावेळी पाहायला मिळाला.

जिनिलियाने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये सलमान स्वत:च्या हाताने रितेश आणि इतर उपस्थित पाहुण्यासाठी भेळ बनवताना दिसला. टेबलवर पाणीपुरी, भेळ, शेवपुरी अशा चाट पदार्थांसाठी खास तयारी केलेली दिसते. सलमान मन लावून भेळ बनवताना दिसला आणि त्याने ती वाटी रितेशच्या हातात दिली. 'चला, भाऊंची भेळ खाऊया', असे म्हणत रितेशही एन्जॉय करताना दिसला. रितेश-सलमानचा हा क्षण जिनिलियाने कॅमेऱ्यात कैद केला असून, देशमुख दाम्पत्याने सलमानने बनवलेल्या भेळीला 'भाऊंची भेळ' असे नाव दिले. जिनिलियाने व्हिडिओ शेअर करताना दिलेल्या कॅप्शनमध्येही हा उल्लेख केला.

जिनिलियाने म्हटले, 'सलमान खानसारखं या जगात कोणीच नाही, तुम्हाला अगदी घरासारखे वाटावे आणि तुम्ही त्याच्यासाठी खूप खास आहात याची जाणीव व्हावी, याकरता तो काहीही करू शकतो. यावेळी त्याने खूपच चविष्ट 'भाऊंची भेळ' खाऊ घातली. आमचे तुझ्यावर खूप प्रेम आहे.'

रितेशनेही सलमानसोबतच्या सेलिब्रेशनदरम्यानचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोत सलमान आणि रितेश-जिनिलियासह अर्पिता खान, कांची कौल, शबिर अहलुवालिया हे सेलिब्रिटीही दिसत आहेत. याशिवाय दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील सुपरस्टार राम चरणही या फोटोत आहे. रितेशने या सर्व कलाकारांना टॅग करत सलमानच्या वाढदिवसाचा हा फोटो शेअर केला आहे.दरम्यान अभिनेत्याच्या वाढदिवशी चाहत्यांना एक खास सरप्राइजही मिळाले. त्याच्या 'बॅटल




ऑफ गलवान' या आगामी सिनेमाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आहे. सलमान खानसह या चित्रपटात चित्रांगदा सिंह मुख्य भूमिकेत झळकणार असून, 17 एप्रिल 2026 रोजी हा चित्रपट रीलिज होणार आहे.

फॅशन...

## काही गोष्टी सोडून द्यायला हव्या, फार अटॅचमेंट नको...'



झी मराठीवरील Kamali ही मालिका सध्या विशेष चर्चेत आहे. अलिकडच्या आठवड्यात या मालिकेने 4.1 टीव्हीआरसह 9 वाजताच्या टाइम स्लॉटमध्ये अव्वल स्थान मिळवले. मीडिया रिपोर्टनुसार मराठी मालिकांच्या टीआरपी यादीत 'कमळी'ने तिसरे स्थान मिळवले आहे. मालिकेने टीआरपीमध्ये मारलेली बाजी पाहता सर्वच कलाकारांच्या वर्षाचा शेवट गोड होणार आहे. शीर्षक भूमिकेत असणाऱ्या कमळीसह मालिकेतील इतर पात्रेही त्यामुळे विशेष चर्चेत आली आहेत. या मालिकेत 'अनिका' हे पात्र अभिनेत्री केतकी कुलकर्णी साकारते. 2025 या वर्षाला निरोप देताना अनिकाने तिच्या मालिकेतील प्रवासाविषयी आणि 2025 हे वर्ष तिच्यासाठी कसं गेलं, याविषयी भाष्य केलं.

केतकी म्हणाली, 2025 हे वर्ष तिच्यासाठी संमिश्र अनुभवांचे होते. ती म्हणाली, 'जानेवारी ते जुलै या काळात मी एक वेगळी व्यक्ती होते आणि जुलै ते डिसेंबरमध्ये मी पूर्णपणे बदलले. सध्या मी जी आहे ती व्यक्ती मला जास्त आवडते. 2025 हे वर्ष मी अनेक शिकवणींसह संपवत आहे, अशी शिकवण जी मी आयुष्यभर माझ्यासोबत ठेवणार आहे.'

## लालभडक साडीत श्वेता शिंदेचा मराठमोळा लुक, ब्लाऊजच्या डिझाईनने वेधले लक्ष



मराठी मनोरंजनसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अभिनेत्री श्वेता शिंदे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी कारण आहे तिचा लालभडक रंगातील पारंपरिक पैठणी साडीतील मनमोहक मराठमोळा लुक. साधेपणा, सौंदर्य आणि परंपरेचा सुंदर संगम असलेला हा अवतार पाहून चाहत्यांनी अक्षरशः प्रेमाचा वर्षाव केला आहे. या लुकमध्ये श्वेताने नेसलेली पैठणी साडी पारंपरिक काठ, नाजूक जरकाम आणि रंगीत नक्षीकामामुळे अधिक उठून दिसते. लाल रंगाची भव्यता आणि पैठणीची शाही ओळख यांचा सुंदर मेळ तिच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा ठरतो. साडीसोबत केलेली पारंपरिक दागिन्यांची निवड नथ, बांगड्या, ठुशी या सगळ्यामुळे तिचा मराठमोळा अंदाज अधिक खुलून आला आहे. (फोटो सौजन्य :- @ shwetashinde_official)

श्वेता शिंदेच्या लाल साडीतील लुक पारंपरिक मराठी सौंदर्य आणि आधुनिक स्टाईलचा परफेक्ट संगम. लाल साडीवरील नाजूक ब्लाऊज, थ्री-फोर्थ हातांचे कट, हातांवरील हिरवे चुडे आणि पारंपरिक ज्वेलरी या सर्वांनी एक मोहक आणि उठावदार लूक तयार केला होता. साधा पण उठावदार मेकअप, नैसर्गिक ग्लोसह डोळे आणि हलका ब्लश या सर्व घटकांनी पैठणीतील लुक अधिक आकर्षक आणि लक्षवेधी बनवला होता.

या मराठमोळ्या लुकसाठी श्वेता शिंदेचा मेकअप अतिशय साधा पण उठावदार ठेवण्यात आला होता. त्वचेला नैसर्गिक ग्लो मिळावा यासाठी हलका बेस आणि सॉफ्ट फाउंडेशन वापरण्यात आले होते. डोळ्यांसाठी ब्राऊन शेडचा सौम्य आयशॅडो, काजळ आणि आयलाइनरमुळे नजर अधिक बोलकी दिसत होती. भुवया नैसर्गिक ठेवत चेहऱ्याच्या रेषा ठळक होतील असा हलका कंटूर करण्यात आला होता. गालांवर सौम्य ब्लश आणि ओठांसाठी न्यूड ते हलक्या लालसर छटेतील लिपस्टिक वापरण्यात आली होती. कपाळावरील लाल टिकली आणि नाकातील नथ यामुळे संपूर्ण मेकअपला पारंपरिक मराठी सौंदर्याची मोहक जोड मिळाली.

## कॉटनच्या पिंक साडीत गायत्री दातारने दाखवला लाईफ पार्टनर



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री गायत्री दातार पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. नुकतंच तिने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती लाईट पिंक रंगाच्या कॉटन साडीत दिसत आहे. मात्र या व्हिडिओमुळे तिच्या चाहत्यांमध्ये जास्त लक्ष वेधून घेतलं कारण व्हिडिओमध्ये गायत्रीने आपला लाईफ पार्टनर, श्रीकांत याला देखील दाखवले.गायत्री दातार ही तिच्या अभिनयासोबतच आपल्या साध्या पण स्टाइलिश लूकसाठीही ओळखली जाते. ती नेहमीच आपल्या फॅशन निवडीसाठी चर्चेत राहते.या नवीन व्हिडिओमध्ये ती साध्या पण आकर्षक पिंक साडीत दिसत असून तिचा नैसर्गिक मेकअप आणि सोपी स्टाईल लक्ष वेधून घेत आहे.व्हिडिओमध्ये गायत्री आणि श्रिकांत दोघेही आनंदी दिसत आहेत. अनेक चाहते आणि फॅन्सने कॉमेंट्समध्ये लिहिलं नवऱ्याचा चेहरा एवढा लपवून ठेवल होतंस "एवढं लपवण्यासारखं काय आहे?" अशा कमेंट्स केल्या आहेत. (फोटो सौजन्य :- @gayatridataroffical)

गायत्री दातारच्या या व्हिडिओमध्ये तिचा साधा पण मोहक फॅशन स्टाइल लक्ष वेधून घेतो. पिंक रंगाच्या कॉटन साडीत ती नाजूक आणि नैसर्गिक दिसते. साडीसोबत ती नेहमीप्रमाणे हलकेसे मेकअप आणि साधे ज्वेलरी वापरली आहे, ज्यामुळे तिचा लूक आकर्षक दिसतो. पिंक रंगाच्या साड्यामुळे तिचा फेअर कॉम्प्लेक्शन अधिक उजळून दिसतो,

## जान्हवीच्या आठवणीत जयंत कासावीस, लक्ष्मीच्या वाढदिवसानिमित्त केला डान्स;



मुंबई - 'झी मराठी' वाहिनीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका आघाडीच्या मालिकांपैकी एक आहे. प्रसारित झाल्यापासून या मालिकेला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळालं आहे. 'लक्ष्मी निवास' या मालिकेमध्ये अनेक ट्विस्ट येतायत. अशातच आता 'झी मराठी' शेअर केलेला 'लक्ष्मी निवास' मालिकेचा प्रोमो चर्चेत आलंय.

सध्या 'लक्ष्मी निवास' मालिकेमध्ये जयंतच्या जाचाला कंटाळून जान्हवी समुद्रात उडी मारते. पण, तिला विश्वाचे बाबा वाचवतात आणि स्वतःच्या घरी घेऊन जातात. काही दिवसांनी तिची आणि विश्वाची भेट होते. विश्वाचं तिच्यावरचं असलेलं प्रेम जान्हवीला लक्षात येतं. मात्र, सई विश्वाच्या आयुष्यात आल्यामुळे जान्हवी सई आणि विश्वाला एकत्र आणण्याचा प्रयत्न करते. सई आणि विश्वाचा साखरपुडा होतो. मात्र, जान्हवी पुन्हा आपल्या आयुष्यात आल्यामुळे काहीतरी संकेत असेल असं विश्वाला वाटतं. तर, दुसरीकडे जयंत जान्हवीच्या शोधात असतो. जान्हवीला जयंत पासून वाचवण्यासाठी विश्वा कायम प्रयत्न करतो. अशातच आता लक्ष्मीचा वाढदिवस विश्वा, भावना आणि सिद्धू गाडेपाटलांच्या घरात करायचा ठरवतात. या निमित्ताने सगळे डान्स परफोर्मन्स करतात. जयंतच्या डान्सचा प्रोमो झी मराठीने सोशल मीडियावर शेअर केला आहे.


झी मराठीने शेअर केलेल्या 'लक्ष्मी निवास' मालिकेच्या प्रोमोमध्ये जयंत जान्हवीच्या पोस्टरसमोर 'मेरे हाथ मै तेरा हाथ हो' या गाण्यावर डान्स करताना दिसतोय. जान्हवीच्या आठवणीत जयंत कासावीस झाल्याचा दिसून येत आहे. त्याच्या डोळ्यामध्ये जान्हवीबद्दलचं प्रेम दिसून येतंय.

'लक्ष्मी निवास' मालिकेच्या या प्रोमोवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करत जयंतबद्दल काळजी व्यक्त केली आहे. 'बिचारा जयंत...जान्हवी जयंतकडे जा आणि त्याला समजून घे... विश्वाला सईसोबत खुश राहूदे', 'स्क्रिप्ट बदलायला सांगा आणि जयंत-जान्हवीला एकत्र आणा', 'मेघन अभिनेता म्हणून खूप चांगला आहे', 'जयंत-जान्हवीला एकत्र आणा' अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.

## साक्षीच्या दारापर्यंत पोहोचले पोलीस; 'समीरा'ची उडाली घाबरगुंडी!

Tharala Tar Mag मालिकेच्या 29 December 2025 च्या भागात दाखवण्यात आले की, प्रतिमाच्या खोट्या मृतदेहाशी प्रियाचा डीएनए कसा जुळला, या प्रकरणाचा अर्जुन आणि सायली शोध घेत आहेत. काही महिन्यांपूर्वी प्रतिमाचा मृतदेह किल्लेदार आणि सुभेदारांना हॉस्पिटलकडून सुपूर्द करण्यात आलेला, प्रियाशी डीएनएही जुळले होते. त्यानंतर प्रतिमा खरोखरची परत आल्याने खोट्या डेडबॉडीचे प्रकरण मागे पडले होते. आता सायली-अर्जुन या सगळ्याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहेत.

प्रतिमाच्या खोट्या मृत्यूच्या प्रकरणादरम्यान रविराजला डीएनए टेस्टचे जे अहवाल हॉस्पिटलकडून मिळाले होते, त्या कागदपत्रांमध्ये अर्जुनला आता अनेक त्रुटी आढळतात. त्यावरुन हॉस्पिटलमधील कागदपत्रांमध्ये काहीतरी फेरफार नक्की झाला होता हे त्यांच्या लक्षात येते. शिवाय कोणाच्या तरी सांगण्यावरुनच तो मृतदेह प्रतिमाचा असल्याचे भासवण्यात आले होते, हे त्या तिघांच्याही लक्षात येते. प्रतिमाच्या खोट्या मृतदेहाच्या प्रकरणाशी कोण आहे, या सगळ्याचा महिपतशी काही संबंध आहे का आणि किल्लेदारांच्या अपघाताची सुपारी देणाऱ्या 'मिस्ट्री मॅन'चे यामध्ये काही कनेक्शन आहे का, या गोष्टींचा शोध अर्जुन-सायली घेत आहेत. आता या प्रकरणाचा उलगडा कसा होईल, हे आगामी भागात पाहता येईल. आगामी भागाचा एक खास प्रोमोही प्रेक्षकांच्या



भेटीला आला आहे.

एकंदरित या खोट्या मृतदेहाच्या प्रकरणात सायली-अर्जुनची साथ देण्यासाठी अश्विन पुढे येणार आहे. आगामी भागाच्या प्रोमोत असे दाखवले की, सायली अश्विनला म्हणते, 'मनातली अढी काढून टाकण्याची हीच तर वेळ आहे अश्विन भावोजी... आम्हा दोघांना तुमच्याशी बोलायचं होतं. एक महत्वाचं काम आहे.' त्यावेळी अर्जुनही तिथे उपस्थित असतो. अश्विन त्या दोघांकडेही बघून होकारार्थी मान डोलावतो. ज्या हॉस्पिटलमधून प्रतिमाचा खोटा मृतदेह किल्लेदारांना सुपूर्द करण्यात आलेला, तिथे अश्निन स्वत: डॉक्टर असल्याने अर्जुन-सायली त्याची मदत घेत आहेत. आता प्रियापासून लपवून अश्विन त्यांची मदत कशी करेल, हे पाहणं महत्वाचं ठरेल.

दुसरीकडे या प्रोमोमध्ये बिथरलेली साक्षी पाहायला मिळते आहे. तुरुंगातून पळून आल्यानंतर साक्षी 'समीरा शेखर' म्हणून वावरते आहे. प्रोमोत दाखवले आहे की, समीरा आता ज्या ठिकाणी राहते त्या फ्लॅटच्या दाराबाहेर काही पोलीस उभे आहेत. ते एका व्यक्तीशी बोलताना दिसले. ती जिवंत असल्याचे पोलिसांना समजले तर नसेल ना, असा विचार करुन साक्षीची घाबरगुंडी उडते.



## 'धुरंधर' आता घरबसल्या पाहा! लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्मची चर्चा, तारीखही ठरली?

आदित्य धर दिग्दर्शित रणवीर सिंग आणि अक्षय खन्ना यांचा स्पाय थ्रिलर सिनेमा Dhurandhar लवकरच प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे. चित्रपटाच्या ओटीटी रिलीजबाबत चर्चा होते आहे. अक्षय खन्ना आणि रणवीर सिंह यांच्या भूमिकांमुळे चर्चेत आलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरील अनेक रेकॉर्ड तोडले, एवढेच नव्हे तर सिनेमाचे कथानकही प्रेक्षकांना भावले आहे. पुढील वर्षी येणाऱ्या 'धुरंधर पार्ट 2'साठीही प्रेक्षक आतापासूनच उत्सुक आहेत. आता, चित्रपटाच्या ओटीटी रिलीजबद्दल माहिती समोर आली असून, संभाव्य तारीख आणि ओटीटी प्लॅटफॉर्मविषयीचे हे अपडेट आहे.

रणवीर-अक्षयसह या सिनेमात आर. माधवन, अर्जुन रामपाल, संजय दत्त, राकेश बेदी, सारा अर्जुन, गौरव गेरा, दानिश पांडोर इ. असे दिग्गज कलाकार झळकले आहे. सध्या 'धुरंधर'च्या ओटीटी रिलीजची चर्चा आहे. 'धुरंधर' थिएटरमध्ये पहिल्या दिवसापासूनच हिट ठरला, आता प्रेक्षक हा सिनेमा पुन्हा एकदा आरामात पाहण्यासाठी उत्सुक आहेत. शिवाय ज्यांना थिएटरमध्ये 'धुरंधर' पाहता आला नाही, ते विशेष उत्सुक आहे. ओटीटी प्लेवर समोर आलेल्या माहितीनुसार, हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होईल.

'धुरंधर ' या चित्रपटाची ओटीटी रीलिजची संभाव्य तारीखही समोर आली आहे. ओटीटीवर हा सिनेमा 30 जानेवारी 2026 रोजी रीलिज होईल अशी शक्यता आहे. अद्याप सिनेमाचे निर्माते किंवा कलाकारांकडून याविषयी अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तसेच नेटफ्लिक्सनेही यासंदर्भात कोणतीही पोस्ट शेअर केलेली नाही.

दरम्यान 5 डिसेंबर 2025 रोजी सिनेमा रीलिज झाला. 24 व्या दिवसापर्यंत या चित्रपटाने 690.5 कोटी रुपयांची कमाई केली आहे. सॅकनिल्कने ही आकडेवारी दिली आहे. 24 व्या दिवशी ही कमाई 22.5 कोटी रुपये झाली होती. तसेच 25 व्या दिवशीही कोट्यवधींचा आकडा गाठला आहे. 2025 या वर्षात सर्वाधिक कमाई करणारा हा चित्रपट आहे. त्यामुळे ज्यांनी थिएटरमध्ये अद्याप हा चित्रपट पाहिला नाही, ते सिनेमा पाहण्यासाठी विशेष उत्सुक आहेत.

## प्रसाद लिमयेची नवी सुरुवात, जुई गडकरीनं केलं कौतुक; पोस्ट शेअर करत म्हणाली, 'अभिमानास्पद...'

मुंबई - जुई गडकरी ही टीव्ही इंडस्ट्रीतील सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. जुई, स्टार प्रवाह वाहिनीवरील 'ठरलं तर मग' या मालिकेमध्ये सायलीची भूमिका साकारतेय. तिच्या या भूमिकेला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळतंय.

जुईचा मोठा चाहतावर्ग आहे. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रीय असते आणि ती कायम छोट्या पासून मोठ्या बिझनेसला पाठींबा देते. त्यांच्याविषयी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करते. अशातच आता मराठी अभिनेता प्रसाद लिमयेनं नवी सुरुवात केली असून, जुईनं त्याचं कौतुक केलं आहे.


जुई गडकरी आणि प्रसाद लिमये हे खूप चांगले मित्र आहेत. एकेकाळी त्यांच्या अफेअरच्या चर्चाही झाल्या. मात्र, त्यावर अद्याप दोघांनी भाष्य केलेलं नाही. प्रसाद लिमये अभिनेता तर आहेच. पण, त्याचबरोबर त्याचा एक छोटासा बिझनेससुद्धा आहे. अभिनेत्याचं 'अन्नपूर्णा' हे छोटंसं हॉटेल होतं. मात्र, आता प्रसाद चाहत्यांसाठी आनंदाची बातमी घेऊन आला आहे. अभिनेत्यानं ही आनंदाची बातमी सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत सांगितली आहे.

प्रसाद लिमयेच्या 'अन्नपूर्णा' या रेस्टॉरंटची पहिली डाइन इन फ्रँचायझी 'कोल्हापुरी झणका' या ब्रँडने घेतलीये. प्रसादचा हा व्हिडिओ जुई गडकरीनं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला असून, 'अभिमानास्पद...' असं म्हटलं असून प्रसादच्या ठाण्यातील 'अन्नपूर्णा' रेस्टॉरंटला भेट देण्यास सांगितलं आहे.

व्हिडिओमध्ये प्रसाद लिमये म्हणतोय की, 'नमस्कार ठाणेकर! एक-दीड वर्षांपूर्वी मी अशीच एक पोस्ट शेअर केलेली. त्यावर मला ह्या दीड वर्षात खूप छान कमेंट्स आल्या. खूप प्रेम मिळालं, खूप आशीर्वाद मिळाले आणि मला सांगताना खूप आनंद होतोय की, स्वामींच्या कृपेनं आणि तुमच्या सगळ्यांच्या प्रेमामुळे आपलं 'अन्नपूर्णा'

आता नवीन रुपात तुमच्या समोर येतंय. 'अन्नपूर्णा'ची ठाण्यातली सगळ्यात पहिली डाइन इनची फ्रँचायझी 'कोल्हापुरी झणका' या ब्रँडने घेतलीये. लोक विचारायचे अन्नपूर्णाचं डाइन इन कधी सुरू होतंय, आम्हाला जेवायला यायचंय. पण, आम्ही तेव्हा एकत्र लोकांना जेवायला बोलवू शकत नव्हतो. पण आता मला खरंच खूप आनंद होतोय की, तुमच्या संपूर्ण कुटुंबाला घेऊन, तुम्ही अन्नपूर्णाला लवकर या.'

हा व्हिडिओ शेअर करत प्रसादनं, 'अन्न हे पूर्णब्रह्म' नमस्कार मंडळी, तुम्हाला सगळ्यांना एक आनंदाची बातमी द्यायची



आहे.. आपलं "अन्नपूर्णा" आता नवीन रूपात तुमच्यासमोर येत आहे, असंच प्रेम आणि आशीर्वाद कायम आमच्या पाठीशी असू द्या..' असं कॅप्शन लिहिलं आहे.

## अर्थविश्व...

### एका वर्षात ३५८ % वाढ, शेअरचे होणार १० तुकडे, कंपनी देणार ३ बोनस स्टॉक, गुंतवणूकदारांना लॉटरी



मुंबई : A-1 लिमिटेड ही कंपनीने मोठी घोषणा केली आहे. कंपनीकडून शेअर धारकांना बोनस शेअर्स आणि स्टॉक स्प्लिटचा दुहेरी लाभ दिला जाणार आहे. कंपनी 3:1 च्या प्रमाणात बोनस शेअर्स देणार आहे, म्हणजेच प्रत्येक शेअरवर तीन बोनस शेअर्स मिळतील. तसेच, कंपनी 10 रुपयांचे शेअर 1 रुपयांच्या 10 शेअर्समध्ये रूपांतरित करणार आहे. बोनस शेअर्ससाठी 31 डिसेंबर 2025 ही रेकॉर्ड डेट निश्चित करण्यात आली आहे, तर स्टॉक स्प्लिटसाठी 8 जानेवारी 2026 ही रेकॉर्ड डेट आहे.

दिवसभरात शेअरमध्ये 5 टक्क्यांनी वाढ

गेल्या एका वर्षात A-1 लिमिटेडच्या शेअरमध्ये 358 टक्के वाढ झाली आहे. शेअर 401.70 रुपयांवरून 1840 रुपयांच्या पुढे गेला आहे. 2025 मध्ये आतापर्यंत शेअरमध्ये 357 टक्के वाढ झाली आहे. गेल्या सहा महिन्यांत शेअर 178 टक्के वाढला आहे. कंपनीने यापूर्वी ऑगस्ट 2021 मध्येही 3:20 च्या प्रमाणात बोनस शेअर्स दिले होते. A-1 लिमिटेडचे शेअर सोमवार, 29 डिसेंबर 2025 रोजी बीएसईमध्ये 5 टक्के वाढून 1840.90 रुपयांवर बंद झाले. कंपनीच्या शेअरचा 52 आठवड्यांचा उच्चांक 2816.55 रुपये आहे. तर, 52 आठवड्यांचा नीचांक 385 रुपये आहे.

5 वर्षात 3100 टक्के रिटर्न

A-1 लिमिटेडच्या शेअरने गेल्या पाच वर्षांत तब्बल 3100 टक्के इतका जबरदस्त परतावा दिला आहे. 1 जानेवारी 2021 रोजी 57.52 रुपये असलेला शेअर 29 डिसेंबर 2025 रोजी 1840.90 रुपयांवर बंद झाला. गेल्या चार वर्षांत या शेअरमध्ये 841 टक्के वाढ झाली आहे, तर तीन वर्षांत 484 टक्के आणि दोन वर्षांत 400 टक्के वाढ दिसून आली आहे. A1 लिमिटेडचे पूर्वीचे नाव A-1 ॲसिड लिमिटेड होते. कंपनीची स्थापना 1975 मध्ये झाली. कंपनी औद्योगिक ॲसिड आणि केमिकल्सच्या घाऊक विक्री आणि वाहतुकीमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेली आहे.

### तरुणांनो लक्ष द्या; पगाराचं नियोजन करताना फॉलो करा खास टिप्स...



जग हलली खूप वेगाने बदलताना दिसत आहा. आजची तरणाई लवकरच नोकरी किंवा धंदा करताना दिसतात. त्यामुळे त्यांचे खर्च वाढतात. त्यांचा मासिक पगार महागड्या फोन ईएमआय, प्रीमियम शूज आणि कपडे आणि मासिक ट्रिपवर खर्च होतो. या सर्वांमध्ये, ते आर्थिक नियोजन विसरतात किंवा पूर्णपणे दुर्लक्ष करतात. पण आता हीच चूक भविष्यात महाग पडू शकते.

तज्ञ तुम्हाला तुमची पहिली नोकरी मिळताच बचत आणि गुंतवणुकीला प्राधान्य देण्याचा सल्ला देतात. योग्य वेळी गुंतवणूक सुरू करणे देखील महत्त्वाचे आहे. जर तुम्ही 30 वर्षांपेक्षा कमी वयाचे असाल, तर तुम्ही आर्थिक योजना तयार करण्यासाठी या प्रक्रियांचे पालन करु शकता जेणेकरून तुम्हाला कोणत्याही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये.

### भारत आहे 'सोने की चिडिया'! बाजारात खळबळ, GDP पेक्षा जास्त सोन्याचा खजिना भारतीय घरांत




सोन्याच्या किमती दररोज रेकॉर्डवर रेकॉर्ड करत आहे, त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवाला घोर लागला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव प्रति औंस 4,500 डॉलर्सपेक्षा जास्त झाला आहे, जो आतापर्यंतचा उच्चांक आहे. परिणामी, भारतीय घरांमध्ये सोन्याचे एकूण मूल्य 5 ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त झाले आहे, जे भारताच्या संपूर्ण सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजे जीडीपीपेक्षा जास्त आहे.

भारतीयांच्या घराघरात सोन्याला पसंती

भारतीय महिलांच्या संदर्भात पहिल्यापासून सोन्यानेच मनावर अधिराज्य गाजवले आहे. आपल्या प्रतिष्ठेचे प्रतीक म्हणून मिरवण्यापलीकडे सोन्याचा उपयोग म्हणजे की या कधीही अवनत न होणाऱ्या मालमत्तेमध्ये (एखादी फॅन्सी कार किंवा आयफोनच्या टॉप एंड मॉडेलच्या विपरीत) भारतीय कुटुंबांच्या संपत्तीचा कायापालट करण्याचा प्रभाव आहे. 2011 ते 2024 या कालावधीत भारताने मोठ्या प्रमाणात सोन्याची आयात केली असून सुरुवातीला या आयातीमुळे व्यापारातील तूट वाढली पण या संपत्तीचे डॉलरमधील मूल्य नाट्यमयरित्या वाढले आहे. सध्या सोन्याचा भाव 4,211 डॉलर प्रती औंसवर उसळला असताना या काळात आयात केलेल्या सोन्याचे मूल्य अंदाजे 1.085 ट्रिल्यन डॉलर किंवा सुमारे 175% वाढले आहे.

विशेष म्हणजे ही वाढ भारताच्या सध्याच्या परकीय चलन साठ्यापेक्षा जास्त असून यामधून मालमत्तेचा संग्राहक म्हणून सोन्याची असामान्य भूमिका दिसून येते. 2011 पासून भारताने आयात केलेल्या सोन्याच्या साठ्याचे एकूण वर्तमान मूल्यांकन 1.6 ट्रिल्यन डॉलरच्या जवळपास आहे, तर फक्त 2024 मध्ये आयात केलेल्या सोन्याचे मूल्य त्यावेळी 52 बिलियन डॉलर होते, जे आता 108 बिलियन डॉलरएवढे झाले आहे.

आश्चर्य म्हणजे मार्केटबाबत टिप्पणी करणाऱ्या तज्ज्ञांनी देखील त्यावेळी भारताचे फॉरेक्स रिझर्व्ह आणि व्यापारातील तूट यावर सोने खरेदीच्या प्रभावाबाबत चिंता व्यक्त केली होती. पण त्यावेळी या आयातीमुळे जी दीर्घ-कालीन संपत्ती निर्मिती झाली, त्याची कल्पना केली नव्हती.भारतीयांच्या घराघरात अंदाजे 25,000 ते 30,000 टन सोने असल्याचा अंदाज आहे, जो जगातील सर्वात मोठा खाजगी साठा असेल. तसेच सध्याच्या किंमतीनुसार या सोन्याचे मूल्य सुमारे 3.4 ट्रिल्यन डॉलर ते 4.1 ट्रिल्यन डॉलर आहे.

# विजय हजारे ट्रॉफी- एमपी आणि मुंबईचा सलग तिसरा विजय

## उत्तराखंडने पंजाबला ५ गडी राखून हरवले, चंदेलाचे शतक




मध्य प्रदेश आणि मुंबईने विजय हजारे ट्रॉफीच्या सध्याच्या मालिकेत सलग तिसरा विजय मिळवला आहे. मध्य प्रदेशने सोमवारी अहमदाबादमध्ये केरळवर 47 धावांनी विजय मिळवला. तर, मुंबईने छत्तीसगडला 9 गडी राखून हरवले. दोन्ही संघ 12-12 गुणांसह आपापल्या गटात अव्वल स्थानी आहेत. उत्तराखंडने पंजाबला 5 गडी राखून हरवून अनपेक्षित विजय मिळवला.

नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये केरळने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. मध्य प्रदेशने 46.1 षटकांत सर्व गडी गमावून 214 धावा केल्या. प्रत्युत्तरात केरळचा संघ 41.1 षटकांत 167 धावांवर सर्वबाद झाला. 93 धावांची खेळी करणाऱ्या हिमांशू मंत्रीला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

इकडे, जयपूरमध्ये मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. संघाने प्रथम छत्तीसगडला 39.1 षटकांत 142 धावांवर रोखले. त्यानंतर 24 षटकांत एक गडी गमावून 144 धावा करत विजय मिळवला. कर्णधार शार्दूल ठाकूर सामनावीर ठरला. त्याने 4 बळी घेतले. शम्स मुलानीने 5 बळी घेतले.

उत्तराखंडने कर्णधार कुणाल चंदेलाच्या शतकाच्या जोरावर पंजाबला 5 गडी राखून हरवले. जयपूरच्या अनंत क्रिकेट मैदानावर उत्तराखंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. पंजाबने 50 षटकांत 8 गडी गमावून 269 धावा केल्या. उत्तराखंडने 269 धावांचे लक्ष्य 47.4 षटकांत 5 गडी गमावून गाठले. चंदेलाने 118 धावांची खेळी केली. शाश्वतने नाबाद 51 धावा केल्या.

प्रियांश-तेज स्वी च्या अर्धशतकामुळे दिल्ली जिंकली.

बंगळूरुमध्ये दिल्लीने सौराष्ट्रविरुद्ध 320 धावांचे लक्ष्य 48.4 षटकांत 7 गडी गमावून पूर्ण केले. प्रियांश आर्याने 78 आणि तेजस्वीने 53 धावांची खेळी केली. तर, कर्णधार ऋषभ पंतने 22 धावा केल्या.

## टी-२० सामन्यात ८ बळी घेण्याचा जागतिक विक्रम झाला

### म्यानमारविरुद्ध कारनामा केला, 4 षटकांत 7 धावा दिल्या




भूतानचा फिरकीपटू सोनम येशे याने इतिहास रचला आहे. 22 वर्षीय सोनम, टी-20 क्रिकेटच्या एका सामन्यात 8 बळी घेणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे. येशे याने आपल्या कोट्यातील चार षटकांत 7 धावा देऊन 8 बळी घेतले.

यात एक निर्धाव षटकही समाविष्ट होते. त्याची इकोनॉमी फक्त 1.75 होती.

सोनमने म्यानमारविरुद्ध 26 डिसेंबर रोजी गेलेफू येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात 8 बळी घेतले. भूतान क्रिकेटने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर लिहिले - 'हा एक अविस्मरणीय स्पेल आहे. सोनम येशेची 4 षटकांत 8/7 ची कामगिरी जागतिक विक्रम ठरली आहे.' 2 गोलंदाजांनी 7-7 विकेट घेतल्या आहेत

टी-20 क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच एखाद्या गोलंदाजाने एका सामन्यात 8 विकेट घेतल्या आहेत. यापूर्वी नेदरलँड्सच्या कोलिन एकरमनने 2019 मध्ये आणि अफगाणिस्तानच्या तस्कीन अहमदने 2025 मध्ये एका सामन्यात 7-7 विकेट घेतल्या होत्या. त्याचबरोबर, टी-20 आंतरराष्ट्रीयमध्येही दोन गोलंदाजांनी 7-7 विकेट घेतल्या आहेत.

मलेशियाच्या सयाजरुल इद्रुसने 2023 मध्ये चीनविरुद्ध 8 धावांत 7 बळी घेतले होते.

बहरीनच्या अली दाऊदने 2025 मध्ये भूतानविरुद्ध 19 धावांत 7 बळी घेतले होते.

भूतानने म्यानमारला 82 धावांनी हरवले

सोनम येशेच्या शानदार गोलंदाजीमुळे भूतानने म्यानमारला 128 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केवळ 45 धावांवर ऑलआउट केले. भूतानने हा सामना 82 धावांनी जिंकला. पाच सामन्यांच्या टी20 मालिकेत भूतान सध्या 4-0 ने आघाडीवर आहे. या मालिकेत सोनम येशेने आतापर्यंत 4 सामन्यांत 12 बळी घेतले आहेत. मालिकेतील शेवटचा सामना सोमवारी खेळवला जाईल.

सोनम येशेबद्दल जाणून घ्या

सोनम येशेने जुलै 2022 मध्ये मलेशियाविरुद्ध टी20 आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. तेव्हापासून आतापर्यंत त्याने 34 सामन्यांच्या 33 डावांमध्ये 37 बळी घेतले आहेत. त्याची सरासरी 17.37 आणि इकोनॉमी 5.69 आहे. त्याच्या नावावर टी20 क्रिकेटमध्ये एक चार बळी आणि एक पाच बळी घेण्याचा विक्रमही नोंद आहे.

## मेलबर्नच्या खेळपट्टीला खराब रेटिंग

### आयसीसीने एक डिमेरिट पॉइंट दिला; येथे २ दिवसांत ३६ विकेट पडले होते, एकही अर्धशतक झाले नाही



आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (ICC) ने मेलबर्न क्रिकेट ग्राउंड (MCG) ला खराब रेटिंग दिली आहे. तर, पर्थच्या खेळपट्टीला 'व्हेरी गुड' रेटिंग मिळाली आहे.

सामना रेफरी जेफ यांच्या अहवालानुसार, ICC ने मेलबर्नला शिक्षेच्या स्वरूपात एक डिमेरिट पॉइंट दिला आहे. 2023 मध्ये नवीन खेळपट्टी ग्रेडिंग प्रणाली लागू झाल्यानंतर, पहिल्यांदाच कोणत्याही ऑस्ट्रेलियन मैदानावर कारवाई झाली आहे.

जर एखाद्या मैदानास पाच वर्षांत 6 डिमेरिट पॉइंट मिळाले, तर त्यावर 12 महिन्यांची बंदी येऊ शकते, तथापि, MCG च्या बाबतीत असे होण्याची शक्यता कमी आहे.

MCG मध्ये ऑस्ट्रेलिया-इंग्लंड यांच्यात सुरू असलेली ॲशेस मालिकेतील चौथी कसोटी केवळ 2 दिवसांत (26-27 डिसेंबर) संपली होती. हा सामना इंग्लंडने 4 विकेट्सने जिंकला होता. हा सामना 852 चेंडूंमध्ये संपला होता, जो चेंडूंच्या संख्येनुसार ॲशेस मालिकेच्या 143 वर्षांच्या इतिहासातील चौथी सर्वात लहान कसोटी आहे.

बॉक्सिंग डे कसोटीत अवघ्या 2 दिवसांच्या खेळात 36 विकेट पडल्या होत्या. यात कोणताही फलंदाज 50 धावांचा टप्पा पार करू शकला नाही आणि कोणतीही टीम 200 धावांचा टप्पा पार करू शकली नाही. महत्त्वाचे म्हणजे, बॉक्सिंग डे कसोटी जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी खास असते. यावेळी सामना 2 दिवसांत संपल्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाला सुमारे 10 दशलक्ष डॉलरचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

माजी क्रिकेटपटूंनी टीका केली होती

बॉक्सिंग डे कसोटी २ दिवसांत संपल्यानंतर माजी क्रिकेटपटूंनी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडच्या खेळपट्टीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. इंग्लंडचे माजी कर्णधार केविन पीटरसन, मायकल वॉन, दिनेश कार्तिक यांनी खेळपट्टीवर तीव्र टीका केली होती.

मायकल वॉनने लिहिले होते- खेळपट्टी आहे की विनोद?

इंग्लंडचे माजी कर्णधार वॉन यांनी लिहिले होते- ही खेळपट्टी आहे की विनोद? हा खेळावर अन्याय आहे. खेळाडू, प्रसारक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चाहत्यांसाठी ९८ षटकांत २६ विकेट पडणे चांगली गोष्ट नाही.'

इंग्लंडचे माजी कर्णधार पीटरसन यांनी X वर लिहिले की, 'भारतात जेव्हा कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी अनेक विकेट पडतात, तेव्हा भारताला नेहमीच कठोर टीकेला सामोरे जावे लागते. त्यामुळे मला आशा आहे की ऑस्ट्रेलियालाही त्याच प्रकारच्या टीकेला सामोरे जावे लागेल. न्याय सर्वांसाठी समान असावा.'

क्रिकेट ऑस्ट्रेलिया (CA) चे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉड ग्रीनबर्ग यांनी सामन्यानंतर चूक मान्य केली होती. ते म्हणाले होते की, अशा प्रकारे कमी वेळेत संपणारे सामने कसोटी क्रिकेटच्या भविष्यासाठी चांगले नाहीत आणि CA भविष्यात खेळपट्टीच्या तयारीमध्ये अधिक सक्रिय भूमिका बजावण्याचा विचार करेल.

ग्रीनबर्ग म्हणाले, 'एक चाहता म्हणून हे पाहणे रोमांचक, मनोरंजक आणि आनंददायक होते, पण आम्हाला निश्चितपणे वाटते की कसोटी सामने दीर्घकाळ चालावेत. काल रात्री मला झोप लागली नाही.' ते म्हणाले, 'आम्ही सुरुवातीपासूनच विकेट तयार करण्याच्या बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्वीकारले आहे, पण जेव्हा तुम्ही खेळाच्या व्यावसायिक बाजूवर याचा परिणाम पाहता, तेव्हा खेळपट्टीच्या तयारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे कठीण होते.'

## विजय हजारे ट्रॉफी; तिसरी फेरी, अभिषेक-शुभमन मैदानात उतरणार:




घरगुती एकदिवसीय स्पर्धा विजय हजारे ट्रॉफीच्या सध्याच्या हंगामात तिसऱ्या फेरीचे सामने सोमवारी खेळले जातील. या फेरीत 38 संघ 19 सामन्यांमध्ये वेगवेगळ्या मैदानांवर आमनेसामने येतील. सर्व सामने सकाळी 9 वाजता सुरू होतील, तर काही सामन्यांचे थेट प्रक्षेपण डिजिटल प्लॅटफॉर्म जिओ-हॉटस्टारवर केले जाईल.

रोहित आणि विराट तिसऱ्या फेरीत खेळणार नाहीत

दिल्लीचा विराट कोहली आणि मुंबईचा रोहित शर्मा, जे स्पर्धेतील सर्वात मोठे आकर्षण मानले जात आहेत, ते तिसऱ्या फेरीत खेळणार नाहीत. बीसीसीआयच्या निर्देशानुसार दोघांनी घरगुती क्रिकेटमध्ये पुनरागमन केले होते, परंतु या फेरीत त्यांची अनुपस्थिती निश्चित आहे. दोन्ही खेळाडूंनी कसोटी आणि टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि सध्या केवळ एकदिवसीय फॉर्मेट खेळत आहेत.

तिसऱ्या फेरीत 10 संघ सलग तिसरा विजय मिळवण्यासाठी मैदानात उतरतील, तर 10 संघ पराभवाची हॅट्ट्रिक टाळण्याचा प्रयत्न करतील. आतापर्यंत मध्य प्रदेश, कर्नाटक, उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर, बडोदा, मुंबई, पंजाब, गोवा, दिल्ली आणि बिहारने आपले दोन्ही सामने जिंकले आहेत.

तर, एलिट ग्रुपमधून राजस्थान, पुडुचेरी, आसाम, हैदराबाद, चंदीगड, छत्तीसगड, उत्तराखंड, सिक्कीम, सर्व्हिसेस आणि प्लेट ग्रुपमधून मिझोरामला अजूनही पहिल्या विजयाची प्रतीक्षा आहे.

मुंबई संघाने रोहित शर्माच्या जागी यशस्वी जैस्वालला संघात घेतले आहे. आजारपणामुळे सुरुवातीचे दोन सामने खेळू न शकलेला जैस्वाल सोमवारी छत्तीसगडविरुद्धही मैदानात उतरणार नाही.

## कोहली विजय हजारेमध्ये आणखी एक सामना खेळणार

### पहिल्या दोन सामन्यांत २०८धावा केल्या; रेलवेजविरुद्ध ६ जानेवारीला मैदानात उतरतील

विराट कोहली विजय हजारे ट्रॉफीमध्ये आणखी एक सामना खेळताना दिसणार आहे. रविवारी दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन (DDCA) चे अध्यक्ष रोहन जेटली यांनी याची पुष्टी केली. त्यांच्या मते, कोहलीने दिल्लीसाठी तीन सामने खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

बीसीसीआयच्या नियमांनुसार, सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट असलेल्या खेळाडूंना किमान दोन विजय हजारे सामने खेळणे बंधनकारक होते, परंतु कोहलीला एक अतिरिक्त सामनाही खेळायचा आहे. कोहली 6 जानेवारी रोजी रेल्वेविरुद्ध मैदानात उतरेल. हा सामना बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये खेळवला जाईल.

कोहलीने पहिल्या दोन सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने पहिल्याच सामन्यात शतकी खेळी करत 131 धावा केल्या, तर दुसऱ्या सामन्यात त्याने 77 धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणूनही निवडण्यात आले.

पहिल्या सामन्यादरम्यान कोहलीने आणखी एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. तो लिस्ट-ए क्रिकेटमध्ये सर्वात जलद 16 हजार धावा पूर्ण करणारा फलंदाज ठरला. कोहलीने हा टप्पा 330 डावांमध्ये गाठला आणि सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला, ज्याने 391 डावांमध्ये ही कामगिरी केली होती.

न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय मालिका

बीसीसीआय सूत्रांनुसार, न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघ 8 जानेवारीपर्यंत वडोदरा येथे एकत्र येईल. कोहली एक दिवस आधी पोहोचून सराव करू शकतो अशी शक्यता आहे. तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका 11 जानेवारीपासून सुरू होईल.दरम्यान, अशी बातमी आहे की हार्दिक पंड्या आणि जसप्रीत बुमराह यांना वर्कलोड व्यवस्थापनांतर्गत वनडे मालिकेतून आराम दिला जाईल. दोन्ही खेळाडू 7 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या घरगुती टी-20 विश्वचषकासाठी तयारी करतील.



# अदानी शरद पवारांच्या पाय पडले, अजितदादाही नरमले महाराष्ट्रात लवकरच राजकीय भूकंप?

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबईः शरद पवार ... भल्याभल्यांना न उलगडणारं कोडं... या पैलवानाने टाकलेला डाव विरोधकांना समजत नाही, असं त्यांच्या समर्थकांकडून सतत बोललं जातं. पण याच पवार यांच्या हालचालीमुळे कधीकधी त्यांच्या मित्रांचीही मती गुंग होऊ शकते आणि त्याचाच अनुभव आता काँग्रेसला येतोय. याचं सध्याचं कारण ठरलंय ते उद्योगपती गौतम अदानी यांचा बारामती दौरा . गौतम अदानी काल एआय सेंटरच्या उद्घाटनाच्या निमित्ताने बारामतीत आले, पवारांच्या पाया पडले, भाषणातून त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली अन् जाता-जाता महाराष्ट्रातील जनतेला पुन्हा एकदा राजकीय भूकंपाला तयार राहण्याचे संकेतही देऊन गेले. गौतम अदानींच्या बारामती दौऱ्यात तीन कोणत्या नाट्यमय घडामोडी घडल्या आणि काँग्रेसच्या दोन शत्रूंचे शरद पवार हेचगुरू असल्याचं समोर आलं.

"जगात काही अशी ठिकाणं असतात जी केवळ नकाशावरील ठिपका नसतात.... तर ती प्रगती, परिवर्तन आणि अगणित शक्यतांची प्रतिके बनून जातात, असंच एक ठिकाणअदानी पवारांच्या पाय पडले, अजितदादाही नरमले; महाराष्ट्रात लवकरच राजकीय भूकंप ?म्हणजे बारामती. हे सगळं अतिसामान्य नेतृत्व असलेल्या शरद पवार यांच्या दूरदृष्टीमुळे शक्य झालंय. मी त्यांना माझा गुरू मानतो. मागील ३० वर्षांपासून मी त्यांना ओळखतो आणि कोणाशीही तुलना होऊ शकत नाही, असं ते व्यक्तिमत्व आहे. पवार यांना सगळ्या गोष्टींची माहिती तर असतेच, पण त्याही पलीकडे त्यांचं असणारं ज्ञान, प्रभाव आणि संवेदनशीलता... या गोष्टी तुमच्या मनावर कोरल्या जातात आणि म्हणूनच मी त्यांना गुरू मानतो," हे शब्द आहेत गौतम अदानी यांच्या आजच्या बारामतीतील भाषणाचे. अदानींनी आपल्या भाषणात शरद पवारांचं अगदी तोंडभरून कौतुक केलं. हा कार्यक्रम कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दल असला तरी त्यातून महाराष्ट्राचं राजकारण वेगळ्या वळणावर जाणार असल्याचे संकेतही मिळाले. ते कसे? हे जाणून घ्यायचे असेल बारामतीत आज झालेल्या कार्यक्रमातील चार घटना आपल्याला समजून घ्याव्या लागतील.

### अदानींनी अख्खं पवार कुटुंब एकत्र आणलं

राष्ट्रवादीतल्या फुटीनंतर पवार कुटुंबातही उभी फूट पडली होती. पक्षात पडलेली फूट ही निवडणुकांमध्ये आणि पवार कुटुंबात पडलेली फूट ही अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ठळकपणे दिसून यायची. अनेक कार्यक्रमांमध्ये अजित पवार हे काका शरद पवारांपासून दूर बसायचे, कार्यक्रम संपताच काकांची नजर चुकवून स्टेजच्या मागूनच निघून जायचे, अन् जाहीर भाषणांमधून पवारांवर निशाणाही साधायचे. तर दुसरीकडे शरद पवारही पुतण्या असलेल्या अजितदादांना नमवण्यासाठी पूर्ण जोर लावत होते. एवढंच काय रोहित पवार आणि युगेंद्र पवार हे पुतणेही अजितदादांच्या विरोधात मैदानात शड्डू ठोकत होते. अजितदादांनी लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळेंविरोधात पत्नी सुनेत्रा पवारांना उमेदवारी दिल्यानंतर रोहित आणि युगेंद्र या दोन पुतण्यांनी अख्खा मतदारसंघ पिंजून काढत त्यांच्याविरोधात रान पेटवलं होतं. तर नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवारांनी बारामतीतून थेट अजितदादांविरोधात निवडणूक लढवत त्यांना उघड आव्हान दिलं होतं. या सगळ्या राजकीय घडामोडींनी पवार कुटुंबातील संबंध ताणले गेले होते. मात्र आज बारामतीत वेगळं चित्र पाहायला मिळालं. गौतम अदानींनी जादू केली अन् अख्खं कुटुंब एकत्र दिसलं. गौतम अदानींच्या स्वागताला रोहित पवार पोहोचले, नंतर याच रोहित पवारांनी चक्क अजितदादांच्या गाडीचं सारथ्य केलं. काकाच्या गाडीत पुतण्या ड्रायव्हिंग सीटवर दिसला. तर युगेंद्र पवारही व्यासपीठावर दिसले.



### पवार काका-पुतण्यातील अंतर कमी केलं

पक्षातील फुटीनंतर जाहीर कार्यक्रमांमध्ये काकांसोबत नजरानजर टाळणारे अजित पवार तुम्ही बघितले असतील. पण काकांशेजारच्या खुर्चीवर जाऊन त्यांच्याशी संवाद साधणारे अजित पवार आज बारामतीत दिसले. पवारांनीही यावेळी अजितदादांच्या कानात काहीतरी सांगितलं. आता तो नेमका काय सल्ला होता, हे कळू शकलं नाही. पण काका-पुतण्यातील अंतर कमी झालं, हे मात्र सगळ्यांनाच कळून चुकलं.

### मोदी-पवार वेगळे नसल्याचा मेसेज

"पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नेतृत्वाखालचं भाजप सरकार हे उद्योगपतींचं सरकार आहे. गौतम अदानींसारख्या उद्योगपतींना सगळी कामं देऊन मोदी देश लूटतायत, अदानी कोणतेही नियम न पाळता सरकारकडून काम घेतात आणि देशाचं वाटोळं करण्याचा प्रयत्न होतोय," असं म्हणत काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे देशभर अदानींविरोधात रान पेटवत असतात. त्यामुळे इंडिया आघाडीचे समर्थक अदानींकडे व्हिलन म्हणून पाहतात. मात्र हेच अदानी गेल्या काही दिवसांत दुसऱ्यांदा बारामतीत आले आणि शरद पवारांच्या नावाने उभारण्यात आलेल्या एआय सेंटरचं उद्घाटन केलं. त्यामुळे बारामतीतील आजच्या कार्यक्रमातून मोदी-अदानी आणि पवार असा ट्रँगल तयार होऊन लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला नसेल, तरच नवल.

### पुण्यात पुन्हा महाविकास आघाडी फिस्कटली

बारामतीत ही घटना घडत असताना दुसरीकडे पुण्यात काल पुन्हा नाट्यमय घडामोड घडली. पुण्यात अजितदादा आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीची आघाडी फिस्कटली आणि पवारांची राष्ट्रवादी आता महाविकास आघाडीसोबत जाणार, असं सांगितलं जात असताना काल पुन्हा वेगळीच घडामोड घडली. जागावाटपासाठी महाविकास आघाडीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित राहिले. पण शरद पवारांच्या राष्ट्रवादीचं कोणीही या बैठकीला आलंच नाही. गौतम अदानी बारामतीत आले अन् मविआच्या बैठकीपासून पवारांचा पक्ष दूर राहिला, याचा निव्वळ योगायोग समजावा. पवारांच्या राष्ट्रवादीने आजच्या बैठकीला दांडी मारल्याने काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना आता आक्रमक झालीय. बैठकीबाबत दोन वेळा निरोप देऊनही पवारांची राष्ट्रवादीचं बैठकीसाठी कोणीच न आल्याने यापुढे त्यांना बैठकीला न बोलवण्याची भूमिका महाविकास आघाडीतील इतर पक्षांनी घेतलीय.

### महाराष्ट्रात लवकरच राजकीय भूकंप?

शरद पवार हे भाजपसोबत सत्तेत सहभागी होणार, ही चर्चा महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन नाही. दरम्यानच्या काळात याच मुद्द्यावरून पवारांचा पक्षही फुटला. पण पवार विरोधात लढत राहिले. मात्र आता पुन्हा या चर्चांनी उचल खाल्ली आहे. अलीकडच्या काळात घडत असलेल्या घटनाही तसेच संकेत देत आहेत.काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निशाणावर नेहमीच दोन व्यक्ती प्रामुख्याने असतात. एक नरेंद्र मोदी आणि दुसरे गौतम अदानी... या दोघांविरोधात रान पेटवत भाजपचं सरकार घालवण्याचं राहुल गांधी आणि काँग्रेसचं स्वप्न आहे. मात्र याच काँग्रेससोबत आघाडीत असलेले शरद पवार मात्र नेमक्या याच दोघांचे गुरू आहेत. कारण मी शरद पवारांचं बोट धरून राजकारण आलोय, असं म्हणत तेच आपले राजकीय गुरू असल्याचं याआधीच मोदींनी जाहीर केल्याचं तुम्हाला आठवत असेल आणि काल बारामतीत गौतम अदानीही तेच बोलले. अदानींना बारामतीत बोलावल्याने काँग्रेसमध्ये आणि लोकांमध्येही काय मेसेज जाणार, याची कल्पना शरद पवारांना नसणार, हे शक्यच नाही. मग असं असतानाही पवारांनी अदानींना बारामतीत का आणलं? तर पवार यांचा आता सत्तेच्या दिशेने प्रवास तर सुरू झाला नाही ना? अशी शंका उपस्थित केलीय जात आहे.

# भाजपचा सेफ बालेकिल्ला सोडून मशाल हाती

दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबईः मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप-शिंदेसेना विरुद्ध शिवसेना उबाठा-मनसे अशी थेट लढत होणार आहे. ठाकरे बंधूंनी अद्याप तरी उमेदवारांची यादी जाहीर केलेली नाही. तर भाजपनं त्यांची पहिली यादी प्रसिद्ध केलेली आहे. यात ६६ जणांची नावं आहेत. उमेदवारी प्रसिद्ध होताच काही ठिकाणी नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. भाजपला पहिला मोठा धक्का उत्तर मुंबईत बसला आहे. हा परिसर भाजपचा बालेकिल्ला मानला जातो.

मुंबई महापालिकेच्या आर-मध्य वॉर्डमध्ये येणाऱ्या प्रभाग क्रमांक १४ च्या माजी नगरसेविका आसावरी पाटील यांना भाजपला रामराम केला आहे. बोरिवली विधानसभा मतदारसंघात भाजपची मोठी ताकद आहे. या मतदारसंघानं तब्बल ४४ वर्षे भाजपचा उमेदवार निवडून दिला आहे.

या भागातील भाजपच्या ताकदीची जाणीव असल्यानं कोणत्याही निवडणुकीत इथे बंडखोरी होत नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर आसावरी पाटील यांनी भाजपची साथ सोडत उद्धव ठाकरेंच्या पक्षात प्रवेश केल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.



बोरीवली पूर्वेचा परिसर प्रभाग क्रमांक १४ मध्ये येतो. इथून भाजपनं सीमा शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. तिकीट न मिळताच आसावरी पाटील यांनी मातोश्री गाठत उद्धव ठाकरेंची भेट घेतली आणि पक्षात प्रवेश केला. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत त्यांना एबी फॉर्म देण्यात आला. त्यांची उमेदवारी जाहीर झाली. २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत आसावरी पाटील यांना ८ हजार ३२१ मतं मिळाली होती. त्यांनी शिवसेनेच्या भारती कदम यांचा ७ हजार १८० मतांनी पराभव केला होता.

६७ वर्षीय आसावरी पाटील बारावी पास आहेत. त्यांनी एसईओ म्हणून काम केलं आहे. बागबान फाऊंडेशन ट्रस्टच्या सचिव म्हणून त्या काम करत आहेत. सार्वजनिक शौचालयं, मलनिस्सारण वाहिन्या, पाणी पुरवठा, सार्वजनिक उद्यानं, खेळाची मैदानं या मुद्द्यांशी संबंधित समस्या त्या प्राधान्यानं हाताळतात.

बोरिवली परिसरात भाजपची प्रचंड ताकद आहे. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपनं इथून बाहेरचे उमेदवार दिले. बोरिवलीशी काहीही संबंध नसलेल्या उमेदवारांनादेखील इथल्या मतदारांनी तब्बल ९० हजारांहून अधिकच्या मताधिक्क्यानं निवडून दिलं. या भागातील भाजपची संघटना अतिशय मजबूत आहे. त्यामुळे आसावरी पाटील चमत्कार करणार का, याकडे लक्ष लागलं आहे.

# राज ठाकरेंचे किल्लेदार, ठाकरे बंधूंचे शिलेदार; तिकीट फिक्स होताच मनसे, उद्धवसेनेत नाराजीचा स्फोट



दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबईः मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंची युती झालेली आहे. त्यामुळे मुंबईत भाजप-शिंदेसेना विरुद्ध ठाकरे बंधू असा हायव्होल्टेज सामना रंगणार आहे. महायुती विरुद्ध ठाकरे बंधूंची युती असा संघर्ष रंगत असल्यानं अनेक ठिकाणी इच्छुकांमध्ये नाराजी आहे. यंदा तिकीट मिळणार नसल्याची जाणीव झाल्यानं आता पक्षांतरांनी वेग घेतला आहे. येत्या काही दिवसांत अनेक पक्षांतरं पाहायला मिळणार आहेत. मनसेला जागा सुटल्यानं शिवसेना उबाठाचे माजी नगरसेवकर प्रिती पाटणकर आणि प्रकाश पाटणकर नाराज झाले आहेत. त्यांनी शिवसेना उबाठाला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे.


मुंबई महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९२ वरुन नाराजीनाट्य सुरु झालं आहे. हा प्रभाग युतीत मनसे कडे गेला आहे. मनसेनं इथून यशवंत किल्लेदार यांना उमेदवारी दिली आहे. ते मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे निकटवर्तीय आहे. ही जागा मनसेला सुटल्यानं स्थानिक पातळीवर शिवसेना उबाठामध्ये नाराजी आहे.

माजी नगरसेविका प्रिती पाटणकर आणि प्रकाश पाटणकर नाराज आहेत. दोघेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. आज संध्याकाळी त्यांचा पक्षप्रवेश होईल अशी माहिती आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नंदनवन बंगल्यावर पाटणकर यांचा पक्षप्रवेश संपन्न होईल. विशेष म्हणजे किल्लेदार यांना उमेदवारी जाहीर झाल्यानं मनसेमध्येही नाराजी आहे. किल्लेदार यांना तिकीट मिळताच मनसेच्या सरचिटणीस स्नेहल जाधव यांनी राजीनामा दिला आहे. तिकीट देताना पक्षानं विचारात घेतलं नाही, अशी त्यांची तक्रार आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक १९२ मध्ये नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे.

# शरद पवारांकडून बीएमसी निवडणुकीसाठी ७ उमेदवारांची यादी जाहीर

दिव्य वतन /वृत्तसंस्था



मुंबई : मुंबईतून मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून जाहीर करण्यात आलेल्या या यादीत केवळ 7 उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मुंबई महापालिका निवडणुकीत मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत लढण्याचा निर्णय घेतला आहे. दोन दिवसांपूर्वीच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवास्थानी जावून भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी मुंबई महापालिका निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा केल्याचं स्पष्ट केलं होतं. दोन तास चाललेल्या चर्चेत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या जागावाटपाचा निर्णय झाला होता. यानंतर आता उमदेवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे.

वॉर्ड क्रमांक 43 मधून अजित रावराणे यांना सर्वधारण गटातून उमेदवारी जाहीर झाली आहे. वॉर्ड क्रमांक 140 मधून संजय कांबळे यांना एस.सी. प्रवर्गातून उमेदवारी जाहीर झाली आहे. वॉर्ड क्रमांक 78 हे सर्वधारण महिला गटासाठी आरक्षित होतं. इथे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून रदबा जावेद देऊलकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.


शरद पवार यांच्या पक्षाकडून वॉर्ड क्रमांक 48 मधून वकील गणेश शिंदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तसेच 170 वॉर्डमधून रुही मदन खानोलकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. वॉर्ड 51 मधून आरती चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तर 112 वॉर्डमधून मंजू रविंद्र जयस्वाल यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

शरद पवार यांच्या पक्षाकडून वॉर्ड क्रमांक 48 मधून वकील गणेश शिंदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तसेच 170 वॉर्डमधून रुही मदन खानोलकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. वॉर्ड 51 मधून आरती चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तर 112 वॉर्डमधून मंजू रविंद्र जयस्वाल यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

# भाजपची कोंडी

अमरावती -राज्यातील 29 महानगरपालिकांच्या 2,869 जागांसाठी 15 जानेवारी 2026 रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेच्या 78 जागांसाठी होणारी निवडणूक विशेष चुरशीची ठरण्याची चिन्हे असतानाच, भाजपला आता अंतर्गत बंडाळीचा सामना करावा लागत आहे. उमेदवारी वाटपात डावलले गेल्यामुळे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी भाजपवर प्रचंड नाराज झाले असून, त्यांनी अधिकृत उमेदवारांविरुद्ध बंडाचे निशाण फडकावत अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे.या धारकऱ्यांनी भाजप नेतृत्वावर गंभीर आरोप केले असून, लव जिहाद, गोरक्षण आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर सातत्याने रस्त्यावर उतरून कार्य करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांचा विचार करण्यात आला नसल्याची त्यांची तक्रार आहे.

# 'राजा'च्या आगमनानं निष्ठावंत अडगळीत; मुंबई भाजप अध्यक्षांच्या ऑफिसात ठिय्या; जोरदार घोषणा



दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबईः मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत ६६ जणांची नावं आहेत. नील सोमय्या ते तेजस्विनी घोसाळकर यांच्यापर्यंत अनेकांना तिकिटं देण्यात आलेली आहेत. ही यादी येताच भाजप मध्ये काही ठिकाणी नाराजी उफाळून आली. प्रभाग क्रमांकमध्ये १८५ मधील भाजप कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत थेट दादरमधील भाजप कार्यालय गाठलं. पक्षानं पुनर्विचार करावा आणि उमेदवारी मागे घ्यावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. बाहेरुन आलेल्याला उमेदवारी कशासाठी, असा सवाल भाजप कार्यकर्ते विचारत आहेत.

धारावीत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १८५ मधून रमेश नाडर यांना तिकीट मिळेल, असं भाजपच्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना वाटत होतं.

पण पक्षानं अनपेक्षित निर्णय घेतल्यानं पदाधिकारी, कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला. काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या रवी राजा यांना तिकीट देण्यात आलेले कार्यकर्ते संतापले. त्यांनी दादर येथील भाजप कार्यालयात गोंधळ घातला.

बाहेरचा माणूस नको, अशा घोषणा देत स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालय दणाणून सोडलं. रमेश नाडर बऱ्याच कालावधीपासून पक्षाचं काम करत आहे. प्रभागात त्यांची चांगली ताकद आहे. मग तरीही त्यांना उमेदवारी का दिली नाही, असा सवाल कार्यकर्त्यांनी केला. नाडर यांना डावलून राजा यांना उमेदवारी देण्यात आल्यानं भाजपमध्ये नाराजीचा सूर आहे.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते असलेल्या रवी राजा यांनी गेल्याच वर्षी भाजपमध्ये प्रवेश केला. देवेंद्र फडणवीस आणि आशिष शेलार यांच्या उपस्थितीत त्यांनी कमळ हाती घेतलं. रवी राजा १९९२ पासून ते मुंबई महापालिकेवर निवडून जात आहेत. ते पाच टर्मचे नगरसेवक आहेत. त्यांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवलं आहे.

## महत्त्वाचे...


### काँग्रेसची 87 उमेदवारांची पहिली यादी जाहीर...



दिव्य वतन /वृत्तसंस्था

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सोलापूर महापालिकेसाठी जागावाटपाचीकांना पाहून घेण्यापर्यंत गेली. यामुळे पत्रकार परिषदेच्या ठिकाणी त्यानुसार सोलापूरसाठी ही पहिली यादी जाहिर करण्यात आली आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयाने दिली आहे. मुंबई: मुंबई महानगरपालिकेच्या रणसंग्रामासाठी काँग्रेसने सोमवारी आपली पहिली ८७ उमेदवारांची यादी जाहीर करून निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना काँग्रेसने ही यादी प्रसिद्ध करून महायुती आणि महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांसमोर आव्हान उभे केले आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या २,८६९ जागांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, मुंबईतील २२७ वॉर्डांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच काँग्रेसने ८७ जणांच्या पहिल्या यादीत प्रामुख्याने माजी नगरसेवक आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले आहे.

### परसोडा देवी-वलगाव रस्त्याची दुरवस्था, नागरिकांना त्रास



अमरावती - चांदूरबाजार तालुक्यातील परसोडा देवी-वलगाव रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी परसोडा देवी येथील गावकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंता (एसडीई) यांना निवेदन दिले आहे. परसोडा देवी ते वलगाव या रस्त्याची स्थिती अत्यंत वाईट झाली आहे. रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून आतील दगड बाहेर आले आहेत. तसेच, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खराब रस्त्यामुळे दुचाकी चालवणे अत्यंत अवघड झाले आहे. हा रस्ता परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि रुग्णवाहिकांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावरील दगड बाहेर आल्याने वाहने घसरून अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होते.

### तामिळनाडूत कोल्हापूरच्या तरुणावर जीवघेणा हल्ला

तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यात एका मराठी तरुणावर ऊस तोडायच्या कत्तीने हल्ला केल्याची घटना घडली आहे. हा तरुण स्थलांतरीत मजूर होता. या घटनेत तो जबर जखमी झाला आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात हा नृशंस घटनेची दाहकता दिसून येत आहे.तामिळनाडूचे भाजप उपाध्यक्ष के अन्नामलाई यांनी या घटनेचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात 4 अल्पवयीन तरुणांनी मराठी तरुणावर ऊस तोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कत्तीने हल्ला चढवला. सूरज असे 34 वर्षीय जखमी तरुणाचे नाव आहे. तो कोल्हापूर जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे समजते. पण तामिळनाडू पोलिसांनी अद्याप स्थानिक पोलिसांशी संपर्क साधला नसल्याने त्याची पुष्टी होऊ शकली नाही. तामिळनाडूच्या थिरुथानी रेल्वे स्थानकालगत ही घटना घडली. पीडित तरुण रेल्वेस्थानकाच्या भिंती पलीकडे गंभीर स्थितीत पडला होता